


# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३१-५७/३७ पाने ८ किंमत ३ रूपये अहिल्यानगर, गुरुवार दि. २५.०९.२०२५ अंक नं. १४९ वर्ष ६८ वे दैनिक वर्ष ६२ वे ANR/022/2018-2020





GANDHI
HOUSE OF JEWELS
(PABALWALA)

प्यार, परंपरा और ख़ूबसूरती की अनमोल दास्तान
हर दुल्हन की पहचान - गांधी ज्वेलर्स (पाबलवाला)

ब्राइडल स्टोरीज़
स्थान
आइरिस प्रीमियर,
अहिल्यानगर

२६ | २७ | २८
सितम्बर २०२५

गांधी ज्वेलर्स (पाबलवाला) लक्ष्मी रोड, पुणे





Member of CREDAI
SHUBH REALITY

विश्वास आम्हाला
तुमच्या स्वप्नातील घर साकारण्याचा..
या **दसऱ्याला** आपले स्वप्न साकार करा.
आपल्या **हक्काच्या घरात** प्रवेश करा.

₹ 10.10 लाखापासुन पुढे*
रेडी पझेशन घर
1&2 BHK व टेरेस फ्लॅटही उपलब्ध.
₹ 11,000/- बुकिंग रक्कम

- आकर्षक व दर्जेदार बांधकाम
- नामांकित बँकेतुन गृहकर्ज उपलब्ध
- एमआयडीसी लगत आपल्या हक्काच्या घराचा भव्य प्रकल्प..
- रेरा अंतर्गत रजिस्टर्ड प्रोजेक्ट

प्रोजेक्ट बाय : शुभ रियालिटी
थोडेच फ्लॅट शिल्लक

PMAY 2.0 SUBSIDY 1.80 Lacs.*
प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घेता येणे शक्य.

स्वप्न साकार

MAHA RERA
RERA REG NO. P52200026167
Scan for Rera

मोरया पार्क जवळ, जिमखाना रोड, बोल्हेगांव, एम.आय.डी.सी., ता.जि. अहिल्यानगर

बुकिंगसाठी संपर्क : 70 3000 1006/7



|| श्री गणेशाय नमः ||
आमच्या परिवारातील
स्व.सौ. शोभा कांतीलालजी कोठारी व स्व.सौ. चाँदकंवर चंदुलालजी कोठारी यांच्या प्रेरणेने
जामखेड शहरात १९९९ साली सराफी व्यवसायाची सुरूवात केली.
स्व. रसिकलालजी चंदुलालजी कोठारी यांच्या मार्गदर्शनाने नगर शहरात २००६ साली सराफी व्यवसायाची सुरूवात केली.
स्व. चंदुलालजी मिश्रीलालजी कोठारी यांच्या नाव रूपाने सावेडीत २०१४ साली नव्या रूपात सुरूवात केली.
या सर्वांच्या प्रेरणा, मार्गदर्शन व नाव रूपी आशिर्वादाने

चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..

या आमच्या सावेडी येथील सुवर्णदालनाचे नुतनीकरण करत
११ वा वर्धापनदिनी ३५०० स्क्वे.फुटच्या भव्य सुवर्णदालनात
दिनांक : २५ सप्टेंबर २०२५ रोजी
शुभारंभ
करीत आहोत. आजवरचा हा सुवर्णप्रवास आपल्या सर्वांच्या आशिर्वादामुळेच शक्य झाला आहे.
त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत.

कांतीलाल चंदुलालजी कोठारी
आनंद कांतीलालजी कोठारी
हर्ष आनंद कोठारी प्रेम आनंद कोठारी

११व्या वर्धापन निमित्त
आम्ही आपल्यासाठी घेवून आलो आहोत
खास ऑफर

सर्व दागिन्यांची
प्रतीग्रॅम मजुरी
₹ 888/-
+
डबल फायदा
जेवढ्या वजनाचे सोने
तेवढ्या वजनाची चांदी
चक्क फ्री*

चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*



नवरात्री स्पेशल
उपवासासाठी स्पेशल
टक्कर
मलाई लस्सी
कैलास उडपी लस्सी



कृपया जवळच्या किराणा ड्रायफ्रुट दुकानदारांना संपर्क करा
एक किलो मागे एक
कोलगेट ब्रश
फ्री..फ्री..
रत्नकमल चहा™
ब्रँडेड कंपनीचा चहा व
रत्नकमल चहा
एक वेळेस जरूर तुलना करून पहा
आशिष ट्रेडर्स चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते
रत्नकमल, बुरुड गल्ली, मारुती मंदिरासमोर, अहिल्यानगर- ४१४००१
Contact : 8767369367
इतर कंपन्या पेक्षा 50 ते 70 रुपये कमी किलो मागे
स्वस्त दर्जा त्यापेक्षाही उत्तम.



SUZUKI
SUZUKI TYOHAAR KA UPHAAR!




JOYFUL & COLOURFUL CELEBRATION WITH SUZUKI
EXTENDED WARRANTY 10 YEARS
EXCHANGE OFFER UP TO 5000*
LOAN UP TO 100%*
NO HYPOTHECATION*
REGISTER TO PARTICIPATE ON PURCHASE:

HDFC BANK We understand your world | IDFC FIRST Bank ALWAYS YOU FIRST | SHRIRAM Finance | SUZUKI At Your Doorstep | 10 YEARS | SUZUKI ROADSIDE ASSISTANCE

SIDDHESH MOTORS
- Authorised Dealer -
Plot No. - 1, Sattha Colony, Station Road, Near Newaskar Petrol Pump, Ahilyanagar
9067226655
Branch - Opposite MSEB Substation, Industrial Estate, Nagar-Pune Highway, Kedgaon, Ahilyanagar - 414005 7038599067
Shrigonda - 7038023185

MIDAS SUZUKI
Venture of Bhapkar Auto Pvt. Ltd.
Savedi Naka, Nagar-Manmad Road, Savedi, Ahilyanagar
91 5004 5005
- Sub - Dealer - Rahuri - Lalit Bikes 9766098777 | Rahata - Akshay Auto 9822919702 | Kopargaon - Asmant Auto 8796317536

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचा निकाल जाहीर; अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डीच्या सुवर्णयोग तरुण मंडळास तृतीय क्रमांक

मुंबई – महागणेशोत्सवः महाराष्ट्राचा राज्य उत्सव अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या, 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२५' चा निकाल जाहीर झाला असून सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा येथील तिरंगा गणेशोत्सव मंडळाने राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. तर लातूर येथील वसुंधरा वृक्षारोपी गणेशोत्सव मंडळाने द्वितीय, अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी येथील सुवर्णयोग तरुण मंडळाने तृतीय क्रमांक मिळविला आहे.

यासोबतच जिल्हास्तरीय प्रथम, द्वितीय व तृतीय विजेत्यांची घोषणा करण्यात आली असून तालुकास्तरापर्यंत विस्तारित केलेल्या या स्पर्धेअंतर्गत विजेत्या तालुकास्तरीय मंडळांची घोषणा करण्यात आली आहे.

राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांचा पारितोषिक वितरण समारंभ २५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता रवींद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी, मुंबई येथे आयोजित करण्यात आला असून या समारंभात सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते विजेत्या मंडळांचा पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात येणार आहे.

# कचरा संकलनाची व्यवस्था सुरळीत करा अन्यथा जन आंदोलन छेडणार; नागरिकांची कुचंबना थांबली नाही तर स्वच्छता पुरस्कारांची होळी करणार

नगर – संपूर्ण शहराच्या कचरा संकलनाचा बोजवारा उडाला आहे. घंटागाड्या रस्त्यावरून गायब झाल्या आहेत. ऐन नवरात्र उत्सवाच्या काळात, विशेषतः महिला भगिनींची घरामध्येच साठवाव्या लागणाऱ्या कचऱ्यामुळे मोठी कुचंबणा सुरू आहे. गाडी येत नाही त्यामुळे नाईलाजास्तव नागरिकांना कचरा रस्त्यावर टाकावा लागत आहे. आठ दिवसांत कचरा संकलनाची व्यवस्था सुरळीत करा, अशी मागणी ठाकरे शिवसेनेच्या वतीने शहर प्रमुख किरण काळे यांनी मनपा प्रशासनाकडे केली आहे. अन्यथा नागरिकांमध्ये जात मनपा, सत्ताधारी यांच्या विरोधात जन आंदोलन उभारण्याचा इशारा दिला आहे.

सर्जेपुरा, गोकुळवाडी, रामवाडीसह प्रभाग १० आणि ५ मधील नागरिकांनी उपशहर प्रमुख सुनील भोसले यांच्याकडे मनपाच्या गलथान कारभाराबद्दल तक्रार मांडली होती. त्याची दखल घेत शहर प्रमुख काळे यांनी नागरिकांच्या भेटी गाठी घेत त्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या. प्रभागातील दुरावस्थेची पाहणी केली. यावेळी नागरिकांनी आपली कैफियत मांडली.

यावेळी जय नेटके, सुरज उघडे, कामगार सेना शहर प्रमुख गौरव ढोणे, सामाजिक न्याय आघाडीचे विकास भिंगारदिवे, अर्जुन उघडे, योगेश भोरे, अंकुश उघडे, अभिषेक उघडे, युवा सेना विधानसभा अधिकारी आनंद राठोड, उमेश भोरे, राहुल वाकोडे, विशाल नेटके, अझीम शेख, गुड्डू शेख, नाझीम शेख, इम्रान शेख यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.


सर्जेपुरा, गोकुळवाडी, रामवाडी परिसरात साचलेले कचऱ्याचे ढिगारे.

सुनील भोसले म्हणाले, कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे नागरिकांच आरोग्य धोक्यात आलं आहे. यामुळे रोगराईला निमंत्रण मिळत आहे. जनतेला वेठीस धरले जात आहे. लोकांनी ज्या नगरसेवकांना निवडून दिलं ते तोंड दाखवायला तयार नाहीत. प्रभाग कार्यालयाच लक्ष नाही. नागरिकांनी तक्रारीसाठी फोन केला तर तो कोणी उचलत नाही. प्रशासनाचा हा गलथान कारभार शिवसेना खपवून घेणार नाही.

### आयुक्त, पुढाऱ्यांची ती चमकोगिरी

मनपा आयुक्त यशवंत डांगे अधून मधून रस्त्यावर उचलून स्वच्छता अभियान राबवताना दिसत असतात. जोरदार फोटोसेशन करतात. सत्ताधारी भाजप, राष्ट्रवादीचे कार्यकर्ते देखील स्वच्छता अभियान राबवल्याची पोस्टरबाजी करत असतात. मनपा प्रशासन, सत्ताधाऱ्यांची ही निव्वळ चमकोगिरी आहे. नागरिकांना चमकोगिरी नाही तर खरी स्वच्छता हवी आहे, असा टोला काळे यांनी लगावला आहे.

### अन्यथा स्वच्छता पुरस्कारांची होळी करू

केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत मिशन २०२४ अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षणात ३ ते १० लाख लोकसंख्या असलेल्या शहरांच्या गटात अहिल्यानगरचा देशात पाचवा तर राज्यात चौथा क्रमांक आला आहे. भारत सरकारने वॉटर प्लस आणि कचरामुक्त शहराचे थ्री स्टार मानांकन मनपाला दिले आहे. मनपाने हे पुरस्कार विकत घेतले आहेत काय ? आठ दिवसांत कचरा संकलन व्यवस्था सुरळीत झाली नाही, तर ठाकरे शिवसेना स्वच्छता पुरस्कारांची होळी करून मनपाचा निषेध करेल, असा इशारा काळे यांनी दिला आहे.

## बुऱ्हाणनगर देवी मंदिर परिसरात चोरट्यांनी घातला धुमाकूळ

### पोलिस बंदोबस्त असतानाही अनेक भाविकांच्या दागिन्यांची चोरी

नगर – नवरात्रोत्सवासाठी नगरहून श्री क्षेत्र तुळजापुरला जाणाऱ्या तुळजाभवानी देवीच्या मानाच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी बुऱ्हाणनगर (ता. नगर) येथील श्री अंबिका तुळजाभवानी देवी मंदिरात गेलेल्या अनेक भाविकांचे दागिने चोरट्यांनी चोरून नेले आहेत. २४ सप्टेंबर रोजी दुपारी या चोरीच्या घटना घडल्या आहेत. मंदिर परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात असतानाही चोरट्यांनी या चोऱ्या केल्या आहेत.

या प्रकरणी लष्करी जवान तुषार दिलीप साठे (वय ३०, रा. नारायणडोह, ता. नगर) यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे आर्मी मध्ये अरुणाचल प्रदेश येथे कार्यरत आहेत. सद्या ते सुट्टीवर आलेले असून नवरात्रोत्सव सुरु असल्याने देवीच्या दर्शनासाठी पत्नी आणि दोन लहान मुलांसह २४ सप्टेंबर रोजी ते बुऱ्हाणनगर येथे गेले होते. त्यावेळी दुपारच्या सुमारास तिसऱ्या माळे निमित्त नगरहून श्री क्षेत्र तुळजापुरला जाणाऱ्या तुळजाभवानी देवीच्या मानाच्या पालखीचे आगमन देवी मंदिरात झाले होते. या पालखीचे दर्शन घेण्यासाठी तेथे हजारो भाविकांची गर्दी झाली होती.

त्या गर्दीतुन दर्शन रांगेकडे जात असतांना त्यांच्या मुलाचे गळ्यात सोनेरी रंगाच्या धाग्यामध्ये गाठलेले सोन्याचा ओम व एक सटवाई असे कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरी केल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी आजु बाजुला खाली पडले का काय पाहिले व शोध घेतला परंतु ते मिळून आले नाही. त्यामुळे त्यांनी मंदिर परिसरात बंदोबस्तासाठी तैनात असणारे पोलीसांना मुलाचे गळ्यातील ओम व एक सटवाई चोरी झाले बाबत माहिती दिली.

त्या नंतर ते देवदर्शन करुन बाहेर आले असता तेथे आसराबाई सुखदेव सानप (रा. ढवन वस्ती, तपोवन रोड) यांचे गळ्यातील सोन्याचे डोरले, शालीनी भागीरथ शिंदे (रा. विद्यानगर, अरणगाव रोड)यांच्या गळ्यातील सोन्याचे २० मनी असलेली पोत, ऋषीकेश गोविंद तागडकर (रा. वडारवाडी, भिंगार), यांचे मुलाचे गळ्यातील सोन्याचा ओम, किरण बाळू तागडकर (रा. वडारवाडी भिंगार) यांचे मुलीचे गळ्यातील सोन्याचा ओम, सुभद्राबाई काशिनाथ धनगर (रा. कापुरवाडी सद्या रा. पिचडगाव ता. नेवासा) यांचे गळ्यातील सोन्याचा पत्ता व मनी तसेच त्या ठिकाणी आणखी काही लोकांचे गळ्यातील सोन्याचे दागिन्यांची चोरी झाल्याचे त्यांना समजले असल्याचे त्यांनी फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी चोरट्यांच्याविरुद्ध बीएनएस कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## कोतवालीच्या पोलिस निरीक्षकपदी संभाजी गायकवाड यांची नियुक्ती



नगर – नगर शहरातील महत्वाचे पोलिस स्टेशन म्हणून गणले जाणारे कोतवाली पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक पदी नियंत्रण कक्षात असलेले संभाजी अभिमन्यु गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी २५ सप्टेंबर रोजी हे आदेश काढले आहेत.

कोतवालीचे पो.नि. प्रताप दराडे यांच्यावर मुंबई येथील महिलेच्या फिर्यादी वरून २२ सप्टेंबर रोजी तोफखाना पोलिस ठाण्यात अत्याचाराचा गुन्हा दाखल झालेला आहे. त्यामुळे दराडे यांची तात्काळ नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली होती. तर तोफखान्याचे पो.नि. आनंद कोकरे यांच्याकडे कोतवालीचा अतिरिक्त पदभार देण्यात आला होता. आता पो. नि. गायकवाड यांच्याकडे कोतवाली पोलिस ठाण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. गायकवाड यांनी या पूर्वी नगर जिल्ह्यात जामखेड तसेच पारनेर पोलिस ठाण्यात काम केलेले आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी फेब्रुवारी २०२४ मध्ये त्यांची नाशिक जिल्ह्यात बदली झाली होती. त्यानंतर काही दिवसांपूर्वी ते पुन्हा नगर जिल्ह्यात बदलून आलेले आहेत. त्यांची नियुक्ती नियंत्रण कक्षात मानव संसाधन विभागात होती. आता त्यांना कोतवाली पोलिस ठाण्यात नियुक्ती देण्यात आली आहे.

## ओव्हरलोड गाडी चालवून देण्यासाठी मागितली तीन हजार रुपयांची लाच

### आरटीओ कार्यालयातील वाहन निरीक्षकासह एजंटवर गुन्हा दाखल

नगर – अहिल्यानगर हद्दीतून ओव्हरलोड सिमेंट ची गाडी चालवून देण्यासाठी पुणे जिल्ह्यातील वाहनचालकाला ३ हजारांची लाच मागून ती पंचांसमक्ष स्विकारल्या प्रकरणी नगरच्या उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील वाहन निरीक्षक गीता भास्कर शेजवळ आणि एजंट म्हणून काम करता असलेला खाजगी व्यक्ती इस्माईल पठाण यांच्यावर भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या छत्रपती संभाजी नगर येथील पथकाने ही कारवाई केली आहे.

याबाबत ची हकीगत अशी की तक्रारदार यांनी मौजे पाटस येथून श्री सिमेंट कंपनी मधून ते अहिल्यानगर येथे ओव्हरलोड सिमेंटची गाडी चालवून देण्यासाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय अहिल्यानगर येथे २२ सप्टेंबर रोजी समक्ष येऊन मोटर वाहन निरीक्षक गीता शेजवळ आणि खाजगी इसम इस्माईल पठाण यांची भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांच्या कडे ओव्हरलोड गाडी त्यांच्या हद्दीतून चालून देण्यासाठी पैशाची मागणी केली होती. तक्रारदार यांना पैसे देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी २४ सप्टेंबर रोजी रोजी ला. प्र. वि. कार्यालय छत्रपती संभाजी नगर येथे तक्रार दिली होती. या तक्रारीची शासकीय पंच यांच्या समक्ष पडताळणी केली असता गीता शेजवळ आणि खाजगी इसम इस्माईल पठाण यांनी तक्रारदारास ३ हजार रुपयांची लाच मागणी करून स्वीकारण्याचे कबूल केले. त्यामुळे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे सापळा लावण्यात आला. यावेळी खाजगी इसम इस्माईल पठाण यांनी तक्रारदार यांच्या कडून वाहन निरीक्षक गीता शेजवळ यांच्या सांगण्यानुसार ३ हजार रुपयांची लाच स्विकारली. त्यावेळी त्यास पथकाने रंगेहाथ पकडले. त्यानंतर मोटार वाहन निरीक्षक गीता शेजवळ आणि खाजगी इसम इस्माईल पठाण यांच्या विरोधात भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची कारवाई पोलीस पोलीस उप अधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक संतोष तिगोटे, पोलिस अंमलदार राजेंद्र सीनकर, दीपक इंगळे, प्रकाश घुगरे, सी. एन. बागुल यांच्या पथकाने केली आहे.

## गोमांस विक्री करताना नगरमध्ये एकास पकडले

नगर – राज्यात गोवंशीय जनावरांची कत्तल करण्यास बंदी असताना आणि महापालिकेने नुकतेच शहरातील अवैध कत्तलखाने पाडण्याची कारवाई केलेली असतानाही शहरात पुन्हा गोमांस विक्री करताना एकाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. कोठला परिसरातील सरकारी स्वच्छता गृहा समोर एका पत्र्याच्या टपरीत २४ सप्टेंबर रोजी दुपारी १.३० च्या सुमारास ही कारवाई करण्यात आली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार कबाडी यांना कोठला परिसरात फैरोज समशेर शेख (वय ५५, रा. घासगल्ली, कोठला) हा गोमांस विक्री करत असल्याची माहिती मिळाली. त्यांनी लगेच पोलिस अंमलदार सुनिल पवार, आकाश काळे यांना कारवाईसाठी पाठविले. या दोघांनी तोफखाना पोलिस ठाण्यातील अब्दुल कादर परवेज इनामदार व विनोद गंगावणे यांना सोबत घेत तेथे छापा टाकला. त्यावेळी फैरोज शेख याच्या पत्र्याच्या खोलीत १०० किलो गोमांस, वजन काटा व लोखंडी कोयता असा २१ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. पोलिसांनी तो जप्त करत फैरोज शेख याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.


ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत जाहीर करावी, या मागणीचे निवेदन जिजाऊ ब्रिगेडच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

## अहिल्यानगर जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना मदत जाहीर करावी : जिजाऊ ब्रिगेड

नगर – संपूर्ण महाराष्ट्रातील तसेच अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी आणि पूर परिस्थिती बघता शेतकऱ्यांच्या कुटुंबावर अति भयानक संकट आलेले आहे. ही परिस्थिती शासनाने वेळीच सावरली नाही तर कुटुंबांवर उपासमारीची वेळ येईल आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढतील. त्यामुळे पंचनामा आणि इतर बाबींच्या भानगडीत न पडता सर्व शेतकऱ्यांना तात्काळ मदत जाहीर करावी तसेच पूर्ण कर्जमाफी द्यावी, अशी मागणी अहिल्यानगर जिल्हा जिजाऊ ब्रिगेडच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

निवेदनावर अहिल्यानगरच्या दक्षिण जिल्हाध्यक्षा नंदिनी सोनाळे, जिल्हा कार्याध्यक्ष योगिता कर्डिले, जिल्हा सचिव रोहिणी नलावडे, जिल्हा उपाध्यक्षा प्रतिक्षा भुकन, जिल्हा कोषाध्यक्ष वैशालीताई जिवडे, सह कोषाध्यक्ष स्वाती सुंबरे, जिल्हा सहचिव वंदना निघुट, प्रचारप्रमुख मीनाक्षी वागस्कर, जिल्हा संघटक रुपाली करांडे, जिल्हा संघटक प्रतिभा सोनाळे, जिल्हा संघटक निर्मला काळदाते, जिल्हा संघटक रेखा घोरपडे, जिल्हा संघटक प्रमिलाताई पवार, जिल्हा कार्यकारिणी सदस्य प्रीती तळेकर, माजी जिल्हाध्यक्षा संपूर्णा सावंत, समन्वयक अ‍ॅड. अनुराधा येवले आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## स्कॉर्पिओची चोरी

नगर – हॉटेल चालकाने रात्रीच्या वेळी घरासमोर उभी केलेली महिंद्रा कंपनीची स्कॉर्पिओ गाडी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना २३ सप्टेंबर रोजी रात्री ११.३० ते २४ सप्टेंबर रोजी सकाळी ६.३० या कालावधीत नवनागापूर येथे हॉटेल अरुण च्या पाठीमागे घडली आहे. याबाबत रामभाऊ बबन भोर (वय ५५, रा. हॉटेल अरुण पाठीमागे, नवनागापूर) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा हॉटेल व्यवसाय असून त्यांनी २३ सप्टेंबर रोजी रात्री ११.३० वाजता त्यांचे हॉटेल अरुण बंद करून त्या पाठीमागे असलेल्या घरी गेले. त्यांनी घरासमोर त्यांची महिंद्रा कंपनीची स्कॉर्पिओ गाडी उभी केलेली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी ६.३० वा. त्यांनी घराबाहेर येवून पाहिले असता त्यांना गाडी दिसून आली नाही. त्या गाडीचा त्यांनी आजूबाजूला शोध घेतला, परंतु ती मिळून न आल्याने त्यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला आहे.

## बाळासाहेब टेकाडे यांचे निधन



नगर –केडगावचे माजी सरपंच व अंबिकानगर येथील रहिवासी बाळासाहेब उर्फ रविंद्र लक्ष्मण टेकाडे यांचे अल्पशा आजाराने २१ सप्टेंबर रोजी निधन झाले. त्यांच्यावर केडगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात आई, वडिल, पत्नी, मुलगा, मुलगी, जावई, सुन, नातवंडे असा परिवार आहे. विक्री कर विभागातील अधिकारी शंभुराजे टेकाडे यांचे ते वडील होत.

## सुदाम मोरे यांचे वृद्धापकाळाने निधन



भिंगार – धनगरगल्लीतील रहिवासी सुदाम विठोबा मोरे (वय ८०) यांचे २४ सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. नवनाथ, एकनाथ, शशिकांत मोरे यांचे ते वडील होत.

## कापूरवाडी तलाव धोकादायक स्थितीत; तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करा

### नागरदेवळे परिसराला धोका; नागरदेवळे ग्रामस्थांसह खासदार निलेश लंके यांचे प्रशासनाला निवेदन

नगर – नगर तालुक्यातील मौजे नागरदेवळे हद्दीत असलेला कापूरवाडी तलाव मुसळधार पावसामुळे तुडुंब भरून धोकादायक स्थितीत आला आहे. तलावाच्या बांधावर मोठ्या प्रमाणात झाडे–झुडपे, बाभळी वाढल्याने व भिंतीमधून पाणी पाझरण्याने दुर्घटनेची भीती निर्माण झाली आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत खासदार निलेश लंके यांनी जिल्हा प्रशासनाचे लक्ष वेधले. माजी जिल्हा परिषद सदस्य शरद झोडगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक ग्रामस्थ सुशिल कदम व निखिल शेलार यांनी अप्पर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांना निवेदन दिले. यावेळी सुशील कदम, निखिल शेलार, सागर खरपुडे, सागर चाबुकस्वार, मुकेश झोडगे, राजेश धाडगे, मोहसीन पठाण, समीर पठाण आदी ग्रामस्थ उपस्थित होते.


कापूरवाडी तलाव पावसामुळे धोकादायक स्थितीत आल्याने तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट व स्वच्छता करावी, या मागणीचे निवेदन खा. निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक ग्रामस्थ सुशिल कदम व निखिल शेलार यांनी अप्पर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांना दिले.

गेल्या आठ दिवसांपासून तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे सर्व नाले, ओढे,बंधारे तुडुंब भरले आहेत. कापूरवाडी तलाव पूर्ण क्षमतेने भरल्याने गेल्या दोन दिवसांपासून सांडावरून मोठ्या प्रमाणात पाणी वाहत आहे. त्यामुळे नागरदेवळे गावाचे अनेक पुलांवरून पाणी वाहून संपर्क तुटला होता.तलाव लष्करी हद्दीत असल्याने अनेक वर्षांपासून गाळ उपसा झालेला नाही. त्यामुळे पाण्याचा दाब वाढून धोक्याची घंटा वाजू लागली आहे.

तलावाच्या भिंतीला भगदाड पडण्याची शक्यता व्यक्त होत असून, यामुळे नागरदेवळे गावठाण, पाखरे मळा, पानमळकर मळा, पादीर मळा, बिने मळा, लोंढे मळा, खरपुडे वस्ती तसेच भिंगारलगतचा परिसर धोक्यात आला आहे. भिंत फुटल्यास प्रचंड प्रमाणात पाणी बाहेर पडून मोठ्या प्रमाणावर जीवितहानी व मालमत्तेचे नुकसान होऊ शकते, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. कापूरवाडी तलावाचे स्ट्रक्चरल ऑडिट तातडीने करण्यात यावे, तलावाच्या बांधावरील झाडे–झुडपे व गवताची तातडीने स्वच्छता करावी, पाऊस थांबल्यानंतर व पाणी कमी झाल्यावर तलावातील गाळ उपसा करण्याचा ठोस निर्णय घ्यावा आणि ग्रामस्थ, लष्करी अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्या संयुक्त बैठकीत पुढील उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

पीव्हीसी कारपेट, उडन स्ट्रीप-फ्लोरिंग, वॉलपेपर, वेलवेट कारपेट, गालिचा, रोमन-रोलर- व्हर्टिकल्स - क्लॉथ कर्टन्स व कर्टन्स फिटिंग, सोफा व सोफा मटेरियल,मॅट, मॅटिंग, रबर मॅट, सॉफ्ट - हार्ड मॅट, ग्रीन ग्रास, हिरवी जाळी, मच्छर जाळी, प्लास्टिक मॅट-चटई, कुशन्स-पिलोज, बेडशीट, ब्लॅंकेट, सोफा कव्हर्स, योगा मॅट, क्लिनिंग मटेरियल
गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५

# देशपांडे मल्टीस्पेशॅलिटी हॉस्पिटल, आनंदी बाजार येथे मुंबईतील रेटिना सर्जन डॉ. हितेशी जैन-देशपांडे यांचे क्लॅरिटी नेत्रालय सुरु



नगर - आनंदी बाजार येथील देशपांडे मल्टी स्पेशॅलिटी हॉस्पिटल येथे मुंबईतील रेटिना सर्जन डॉ. हितेशी जैन - देशपांडे यांची पूर्णवेळ ओपीडी आणि शस्त्रक्रिया सेवा सुरू झाली आहे. भारतासह परदेशात (अमेरिका, इंग्लड) येथे उच्च शिक्षण घेतलेले सुपर स्पेशालिटी डॉक्टर अहिल्यानगर येथे रूग्ण सेवा देण्यासाठी उपलब्ध.

डॉ. हितेशी जैन - देशपांडे या नेत्र तज्ज्ञ आहेत. त्यांनी संकरा आय हॉस्पिटल येथे फेलोशिप इन विट्रीओ रेटिना पूर्ण केली आहे. मुंबई येथील नायर रुग्णालयात त्यांनी एमबीबीएस आणि एम.एस. ऑप्थॅलमॉलॉजीची पदव्युत्तर पदवी मिळवली. अमेरीका येथील स्टेनफर्ड येथे त्यांनी ऑक्युलर ऑन्कॉलॉजी ऑब्जरवरशीप, इंग्लंड ग्लासगो येथे एम.आर. सी. एस., दिल्ली येथे डीएनबीचे शिक्षण घेतले आहे.

देशपांडे हॉस्पिटल मध्ये डॉ. हितेशी जैन - देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली डोळ्यांच्या सर्व समस्यांवर एकाच छताखाली अत्याधुनिक नेत्रोपचार उपलब्ध झाले आहेत. मोतिबिंदूवर अत्याधुनिक लेसर उपचार, मधुमेहामुळे होणाऱ्या नेत्र पटलांवरील समस्यांवर उपचार, नेत्रपटल सरकणे, वयोमानानुसार होणाऱ्या नेत्र पटलाच्या समस्या, नेत्र संसर्ग आणि संधिवातामुळे होणारे नेत्र-रोग, डोळ्यांच्या कर्करोगावरील उपचार येथे उपलब्ध आहेत. अवघड मोतीबिंदू शस्त्रक्रियानंतर होणाऱ्या समस्या, येथे नवजात बाळांमधील नेत्रपटल समस्या आणि सर्व रेटिना च्या व्याधींसाठी आता रुग्णांना मुंबई आणि पुण्यात जाण्याची गरज नाही. रेटिनाचे सर्व अद्ययावत निदान, डोळ्याची सोनोग्राफी, अद्ययावत लेसर तंत्रज्ञान, ऑक्टा स्कॅन, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर अशा सुविधांमुळे परिपूर्ण उपचारांची सुविधा हॉस्पिटल मध्ये देण्यात आली आहे.

अहिल्यानगर येथे सर्व दर्जेदार नेत्रोपचार एकाच छताखाली उपलब्ध झाले आहेत. डॉ. जैन - देशपांडे यांनी देश विदेशात उच्च शिक्षण घेतल्यानंतर आपल्या शहरातच आपले ज्ञान, कौशल्य याचा लाभ रूग्णांना उपलब्ध करून देण्याचे ठरवून अत्याधुनिक क्लॅरिटी नेत्रालय साकारले आहे. डॉ. जैन - देशपांडे या नगरमधील लॅप्रोस्कोपीक सर्जन डॉ. हेमंत देशपांडे व स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. प्रीती देशपांडे यांच्या स्नुषा आहेत.

# संत निरंकारी मंडळाच्यावतीने २८ सप्टेंबरला महिला समागम




नगर - संत निरंकारी मंडळाच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाने झोनलस्तरीय क्र.३६ चे 'महिला समागम'आयोजन २८ सप्टेंबर रोजी सकाळी ११:३० ते २:३० या वेळेत गणेश मंगल कार्यालय, पारनेर येथे करण्यात आले असून या सत्संग कार्यक्रमात प.आ.मीना मतेजी (चंद्रपूर निवासी) या उपस्थितितांना आध्यात्मिक मार्गदर्शन करतील.

महिला समागमात विविध भाषेत गीते, भजने, कविता तसेच सत्संग चे महत्व, सतगुरूची मानवी जीवनातील आवश्यकता, मानवी जीवनाचे उद्देश, जीवन जगण्याची कला आदी विषयांवर महिला विचार-मनोगत मांडतील. या प्रसंगी काही संदेश प्रधान नाटिका सुद्धा सादर केल्या जातील. या महिला संत समागम साठी नगर शहर व जिल्ह्यासह बीड, परभणी, हिंगोली, नांदेड आदि ठिकाणाहून महिला भावीक उपस्थित राहणार असून त्यादृष्टीने तयारी केली जात आहे.

महिलांचे सक्षमीकरण व आध्यात्मिक उन्नतीच्या हेतूने आयोजित या निरंकारी महिला समागम मध्ये परिसरातील महिलांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जयसिंग बोरुडे, भास्करराव पिंपरकर तसेच मंडळाचे क्षेत्रीय प्रभारी, ३६अ चे हरीश खूबचंदानी यांनी केली आहे.





दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर (संस्कृती मंत्रालय, भारत सरकार) आणि अहिल्यानगर महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजिलेल्या चित्रप्रदर्शनीचे उद्घाटन करताना आयुक्त यशवंत डांगे आदी. प्रदर्शन पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्मत्रिशताब्दी वर्षासह महाकुंभाच्या भव्यतेस अर्पण करण्यात आले आहे.

# कॅनव्हासवर साकारली देवी अहिल्यादेवींची शिवभक्ती आणि १०० वर्षे जुना महाकुंभ

## दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र आणि महानगरपालिकेच्या वतीने आयोजित प्रदर्शनाचे उद्घाटन

नगर - दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर (संस्कृती मंत्रालय, भारत सरकार) आणि अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय आलेख्य चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या हस्ते करण्यात आले. महावीर कलादालन येथे सुरू असलेल्या या प्रदर्शनात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यावर आधारित व महाकुंभाच्या पार्श्वभूमीवर रेखाटण्यात आलेली विविध चित्रे प्रदर्शित करण्यात आली आहे. नगरकरांनी या प्रदर्शनास अवश्य भेट द्यावी, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले. हे प्रदर्शन २६ सप्टेंबर पर्यंत नागरिकांसाठी खुले असणार आहे.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले, या प्रदर्शनात देशभरातील नामांकित कलाकारांच्या कलाकृतींमधून भारतीय संस्कृती, परंपरा आणि इतिहासाला सजीव आकार देण्यात आला आहे. देशभरातील सुमारे २०० कलाकारांपैकी निवडलेल्या ५३ चित्रांचे येथे दर्शन घडत आहे. या कलाकृतींमधून भारतीय संस्कृती, इतिहास व परंपरेचे विविध पैलू प्रकट होतात.

दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्राच्या संचालिका श्रीमती आस्था कार्लेकर यांनी सांगितले की, कलाकारांनी देवी अहिल्याबाई होळकरांची शिवभक्ती, समाजातील स्त्रियांच्या शिक्षणासाठीचे प्रयत्न, सतीप्रथेचा विरोध आणि माहेश्वरी साड्यांच्या हातमागाला प्रोत्साहन अशा विविध विषयांना कॅनव्हासवर प्रभावीपणे साकारले आहे. ही सर्व कलाकृती रायपूर येथे संस्कार भारतीच्या सहकार्याने आयोजित कार्यशाळेत साकारल्या गेल्या. एका चित्रात देवी अहिल्याबाई घाटावर हातात शिवलिंग धरून उभ्या असल्याचे दर्शन घडते, तर दुसऱ्या चित्रात सतीप्रथेचा विरोध ठळकपणे मांडलेला आहे. तसेच, कुंभमेळ्याच्या कलाग्रामात साधूंची साधना, अपार भक्तांची गर्दी आणि अध्यात्मिक वातावरण या विविध छटा कलाकारांनी आपल्या कलाकृतींमधून सुंदरपणे व्यक्त केल्या आहेत. या चित्रांकडे पाहताना प्रेक्षकांना जणू प्रयागराजच्या कुंभनगरीत उभे असल्याचा अनुभव येतो.

प्रदर्शनाला कला प्रेमी, विद्यार्थी आणि नागरिकांनी उपस्थित राहून उत्साहाने पाहणी केली. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे त्यागमय, सेवाभावी व जनकल्याणकारी कार्य तसेच महाकुंभाची अद्वितीय सांस्कृतिक आणि आध्यात्मिक छटा अनुभवण्याची संधी या प्रदर्शनातून प्रेक्षकांना मिळाली.

यावेळी उपायुक्त विजयकुमार मुंडे, गजानन शेळके (विभाग प्रमुख), दिपक पाटील (वरिष्ठ लेखाधिकारी), सहायक आयुक्त मेहेर लहारे, प्रसिध्दी अधिकारी शशिकांत नजन, शेखर देशपांडे उपस्थित होते.

# केडगाव देवीला दर्शनास येणाऱ्या महिला व भाविकांची आरोग्य तपासणीला प्रारंभ



केडगाव देवीला दर्शनास येणाऱ्या महिला व भाविकांची आरोग्य तपासणी करताना वैद्यकीय अधिकारी.

नगर - शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त केडगाव देवीला दर्शनासाठी येणाऱ्या महिला, बालक व भाविकांची आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा रुग्णालय, महापालिका आरोग्य विभाग, जिल्हा परिषद आरोग्य विभाग, जिल्हा क्रीडा कार्यालय, मेरा युवा भारत, समग्र परिवर्तन युवा बहुउद्देशीय संस्था, जय युवा अकॅडमी, उमंग फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्वस्थ नारी, सशक्त परिवार उपक्रमातंर्गत केडगाव येथील एकता कॉलनी येथे नऊ दिवस मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

आमदार जगताप यांनी समग्र परिवर्तन युवा बहुउद्देशीय संस्था, जय युवा अकॅडमी या सामाजिक संस्था बाळासाहेब पाटोळे, महेश शिंदे राबवित असलेल्या विविध सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.

पाहुण्यांना योगासनांची पुस्तके भेट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. या आरोग्य शिबिरास माजी नगरसेवक मनोज कोतकर, भाजपचे माजी शहराध्यक्ष महेंद्र गंधे, नितीन शेलार, सुजय मोहिते, संध्या पावसे, समिंद्रा पाटोळे, रावसाहेब काळे, विनोद साळवे, बाबू काकडे, उडानच्या अध्यक्षा आरती शिंदे, माहेर फाउंडेशनच्या रजनी ताठे, सूर्या मॉर्निंग ग्रुपचे राजकुमार चिंतामणी, वसंत डंबाळे, निलेश मेढे, जनकल्याणचे नितीन गोरडे, प्राचार्य संजय पडोळे, विनायक नेवसे, विनोद दुशिंग, सुनील सकट, माजी नगरसेविका आशाताई पवार, साहेबराव विधाते, भैय्यासाहेब कांबळे, रुपेश गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, मंगलताई पाटील, रेखाताई विधाते आदी उपस्थित होते.

जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अर्चना धिरडे, समुपदेशक बाळू इदे, मनपा आरोग्य विभागाच्या डॉ. काजल पवार, लॅब टेक्निशियन स्मिता आंधळे, सिस्टर मंदाकिनी दळवे, संपूर्ण सुरक्षा केंद्राच्या क्षेत्रीय अधिकारी वैशाली कुलकर्णी, कार्यक्रम व्यवस्थापक सागर फुलारी, डॉ. संतोष गिऱ्हे आदींनी तपासणी केली.

शिबिर यशस्वी करण्यासाठी रामेश्वर राऊत, मिया सय्यद, नितीन अनारसे, सुभाष काकडे, महेश पेंटा, अरुण ढाकणे, श्रीनिवास नागुल, श्रीधर शेलार, अनिकेत कदम, गणेश निकाळजे, अशोक धुमाळ, सोपानराव कारखिले, अशोक भोसले, पोपट भोसले, दिलीप जाधव, रमेश गाडगे आदींनी परिश्रम घेतले. केडगाव देवीच्या सातव्या माळेनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन. दररोज होणार महिला व भाविकांची आरोग्य तपासणी. शिबिराच्या पहिल्याच दिवशी २५० महिलांची तपासणी.

# तिळवण तेली समाज ट्रस्टच्या समाज मंदिरात नवरात्रौत्सवातील देवीची विविध आकर्षक रुपे



नगर - नवरात्रौत्सवानिमित्त तिळवण तेली समाज ट्रस्टच्या दाळमंडई, संताजी भवन येथील देवी मंदिरात देवीची दररोज विविध रुपात पुजा बांधण्यात येते. आजपर्यंत कमळावरील विराजमान, व हत्तीवरील विराजमान तसेच आदिंची वेगवेगळी रुपे साकारण्यात आली, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्षा सौ.निता लोखंडे यांनी दिली.

तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने दरवर्षी संताजी भवन विठ्ठल-रुख्मिणी मंदिरात घटस्थापना करुन देवीची मुर्ती बसविण्यात आली आहे. नवरात्रौत्सवानिमित्त विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात येत असते. दररोज सायंकाळी ४ वा. भजन, सायं ७.३० वा. संबळ वादनावर आरती होत असते. यावेळी समाज बांधव उपस्थित असतात.

नवरात्रौत्सवात देवीची दररोज वेगवेगळ्या रुपातील बांधण्यात येणारी पुजा ही आकर्षक व मनमोहक असते. देवीचे हे रुप पाहण्यासाठी अनेक भाविक दररोज येथे येतात.

२८ सप्टेंबर रोजी महाराष्ट्राची कुलस्वामीनी श्री जगदंबा तुळजाभवानी मातेची पालखी मिरवणुक व मुक्काम असणार आहे. २ ऑक्टोबर रोजी विजयदशमीनिमित्त सिमोलंघन कार्यक्रम होणार आहे.

नवरात्रोत्सव कार्यक्रम यशस्वीतेसाठी ट्रस्टचे अध्यक्षा सौ.निता लोखंडे, उपाध्यक्ष शोभना धारक, सचिव शशिकांत देवकर, खजिनदार प्रकाश सैंदर, प्रसाद शिंदे, सागर काळे, गोकुळ कोटकर, दत्तात्रय डोळसे, मनोज क्षीरसागर आदि प्रयत्नशील आहेत.

# आयुर्वेदाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे निरोगी लोकांच्या आरोग्याचे रक्षण

## डॉ. संजय पुंड यांचे प्रतिपादन




जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगर व अजय मेडिकलच्या वतीने डॉ. संजय पुंड यांचा सत्कार करण्यात आला.

## जायंट्स ग्रुपच्या वतीने राष्ट्रीय आयुर्वेद दिन उत्साहात साजरा

नगर - आयुर्वेदाचे मुख्य उद्दिष्ट निरोगी लोकांच्या आरोग्याचे रक्षण करणे हे आहे. चांगले आरोग्य राखण्यासाठी आयुर्वेदाने दिलेला महत्वाचा मंत्र म्हणजे भुकेनुसार खा. आयुर्वेद उपचाराचे अजून एक बलस्थान म्हणजे पंचकर्म. शरीरात वाढलेले दोष शरीरातून शास्त्रशुद्ध पद्धतीने बाहेर काढण्याची ही अनोखी पद्धत आहे. आज धावपळीच्या जीवनशैलीत, हवामानातील अनपेक्षित बदल, चुकीच्या खाण्यापिण्याच्या सवयी, व्यायामाचा अभाव आणि मानसिक ताणतणाव यामुळे अनेक नवीन आजार उद्भवू लागले आहेत. अशा वेळी जगासाठी आयुर्वेद ही भारताची अमूल्य देणगी असल्याचे डॉ. संजय पुंड म्हणाले.

जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगर व अजय मेडिकलच्या वतीने राष्ट्रीय आयुर्वेद दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या पुढाकारातून दरवर्षी २३ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय आयुर्वेद दिवस साजरा केला जातो. जायंट्स सप्ताहाच्या निमित्ताने हा उपक्रम पार पडला. यावेळी आयुर्वेद क्षेत्रात दीर्घकाळ कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी सिनेट प्रतिनिधी व गेली २५ वर्षे अध्ययन करणारे गुणे आयुर्वेद हॉस्पिटलचे आयुर्वेद तज्ञ डॉ. संजय पुंड, आयुर्वेदिक एजन्सीचे संचालक व गेली ५० वर्षे योगदान देणारे अशोक शर्मा, केमिस्ट संघटना व जायंट्स ग्रुपचे माजी अध्यक्ष अनिल गांधी (४० वर्षांची सेवा), महाराष्ट्र आयुर्वेद संघटनेचे संचालक सुधाकर बोरुडे, कनक आयुर्वेदिक एजन्सीचे भोंजाळ यांचा जायंट्स वेल्फेअर फाउंडेशनचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे व सचिव अमित मुनोत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

संजय गुगळे म्हणाले की, जायंट्स सप्ताह हा केवळ उत्सव नसून समाजासाठी काहीतरी सकारात्मक घडवण्याचा प्रयत्न आहे. राष्ट्रीय आयुर्वेद दिनाचे औचित्य साधून आयुर्वेद क्षेत्रात योगदान देणाऱ्यांचा सन्मान करण्यात आला आहे. आयुर्वेद हा केवळ आजारांवर उपचार करणारा शास्त्र नसून निरोगी राहण्यासाठी जीवनशैली कशी असावी याचे मार्गदर्शन करणारी प्राचीन पध्दत आहे. आयुर्वेदाच्या मदतीने प्रत्येक घरात निरोगी कुटुंब घडणार असल्याचे ते म्हणाले.

या आठवड्यात विविध सामाजिक उपक्रम घेऊन जायंट्स सप्ताह साजरा करण्यात आला. त्यात रक्तदान शिबिर, जनावरांच्या आरोग्य तपासणी शिबिर, महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर, वृक्षारोपण, महानुभाव आश्रम येथे अन्नदान, जिजामाता प्राथमिक आरोग्य केंद्रास रक्तदाब मोजण्याचे मॉनिटर प्रदान व गुटखा, तंबाखू, सिगारेटच्या दुष्परिणामांबाबत जनजागृतीसाठी पोस्टरचे विमोचन करण्यात आले.


# प्रसिद्ध वक्ते व लेखक राजाभाऊ मुळे यांच्या 'परीसवेध' ग्रंथाचे प्रकाशन

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापनेची शताब्दी साजरी करत आहे. या १०० वर्षांच्या कालावधीत नगर जिल्ह्यात प्रतिकूल संघ उभारणीसाठी मौलिक योगदान दिले अशा आत्म विलोपी व अनामिक कार्यकर्त्यांच्या कामाचा उजाळा देणाऱ्या 'परिसवेध' या पुस्तकाचे प्रकाशन होत आहे. संघाचे कार्यकर्ते व ज्येष्ठ स्थापत्य अभियंता रवींद्र तथा राजाभाऊ मुळे यांनी लिहिलेल्या 'परीसवेध' या पुस्तकाच्या तृतीय आवृत्तीचे प्रकाशन निमित्ताने.

पश्चिम महाराष्ट्रातील अहिल्यानगर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि प्रसिद्ध वक्ते श्री. रविंद्र उपाख्य राजाभाऊ मुळे यांच्या सामान्य माणसाला प्रेरणा देणारे व बहू चर्चित परीस वेध ग्रंथाचे प्रकाशन होत आहे. राजाभाऊ मुळे यांनी परीस वेध ग्रंथात पश्चिम महाराष्ट्रातील आणि विशेषतः अहिल्यानगर जिल्ह्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कठीण कार्य सामान्य माणसात उभे करणाऱ्या स्वयंसेवकांचे योगदान अधोरेखित केले आहे. तसेच निःस्वार्थपणे समाजसेवा, सामाजिक चळवळी उभ्या करणाऱ्या आणि प्रामाणिकपणे आपआपल्या कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवकांची माहिती आणि कठीण काळात संघ कार्य तळागाळात उभे करणाऱ्या स्वयंसेवकांचे योगदान परिस वेध ग्रंथात दर्शविले आहे. सदर ग्रंथ तरुण पिढीसाठी प्रेरणादायी शिदोरी ठरणार आहे. राष्ट्रीय विचारांचे साहित्य प्रकाशित करणाऱ्या भारतीय विचार साधना पुणे यांनी प्रसिद्ध केलेल्या परीस वेध ग्रंथाचे प्रकाशन दिनांक २६ सप्टेंबर रोजी अहिल्यानगर होत आहे.भारतीय जनता पक्षाचे केंद्रीय पूर्व संघटन महामंत्री व विद्यमान राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय सह संपर्क प्रमुख रामलालजी तथा श्री प्रसिद्ध क्षेत्र देवगढ संस्थांनचे श्री भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते होणार आहे. परीसवेध ग्रंथामध्ये जवळ जवळ एकूण ८० स्वयंसेवकांचे चरित्रे असून ३२२ एवढी पृष्ठ संख्या आहे.

पश्चिम महाराष्ट्र आणि त्यात ही अहिल्यानगर जिल्हा पूर्वी पासून काँग्रेसच्या विचाराचा बालेकिल्ला राहिलेला असून काँग्रेस पक्षासह तेथे साम्यवादी, समाजवादी आणि कम्युनिस्ट यांचा मोठा दबदबा होता. त्यामुळे काँग्रेस विचारसरणी असलेल्या डाव्या चळवळीच्या गढात त्यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कठीण कार्य उभे करणे एक आव्हान होते. समाजवादी आणि कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी सहकार चळवळीत प्रवेश केला होता त्यामुळे संघ कामाचा मोठा विरोध तेथे होता. संघविरोधी गुंड प्रवृत्तीचे माणस संघ शाखेवर हल्ले करायचे किंवा संघ शाखेत येणाऱ्या स्वयंसेवकांना धाकदपट करून संघ शाखेत जाण्यास मज्जाव सुद्धा करायचे. संघ कार्यकर्त्यांची आर्थिक कोंडीसुद्धा होत असे. पण अशा कठीण संघर्षाच्या काळात आणि कोणतीही साधन सुविधा नसतांना अहिल्यानगर जिल्ह्यात संघाचे काम रुजविण्यात संघाचे ज्येष्ठ प्रचारक दामूअण्णा दाते व तत्कालीन प्रांत संघचालक माणिकराव पाटील यांच्या सारख्या असंख्य स्वयंसेवकांचे योगदान फार महत्त्वाचे आहे. सदर ग्रंथामध्ये राजाभाऊ मुळे यांनी अण्णा पाटील कदम पासून प्रा.कचेश्वर सहाणे आणि प्रचारक राजाभाऊ भोसले पासून सूर्यभानजी वहाडणे पाटील अशा अनेक परीस रूपी संघ स्वयंसेवकांच्या व्यक्तिमत्वाचा वेध घेतला आहे.तसेच परीस वेधमध्ये संघ काम हिंदू समाजातील अठरा पगड जाती आणि बारा बलुतेदार समाजात कसे दृढ झाले.बहुजन समाज संघ कार्यासोबत कसा जोडला गेला याचे मार्मिक विवेचन व संघर्षाच्या काळात हिंदू जागरणच कार्य ज्यांनी उभे केले अशा कार्यकर्त्याच स्मरणसुद्धा ग्रंथात केले गेले आहे.

राजाभाऊ मुळे हिंदुत्व विचारसरणीच्या चळवळीतील आश्वासक चेहरा आणि कार्यकर्त्यांचे आधारवड असून व्यवसायाने बांधकाम व्यवसायी आहेत.त्यांनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (सी.ओ.इ.पी.) पुणे येथून स्थापत्य अभियांत्रिकी पदवी प्राप्त केली आहे. अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करून त्यांनी काही वर्ष संघाचे प्रचारक म्हणून काम केलेले आहे. तसेच अहिल्यानगर जिल्हा कार्यवाह ते पश्चिम महाराष्ट्र संपर्क प्रमुख अशा वेगवेगळ्या दायित्वाचे यशस्वी निर्वाहन सुद्धा केले केले आहे. आता प्रसिद्ध होत असलेल्या परीस वेध ग्रंथाच्या प्रथम आवृत्तीस राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉक्टर मोहनजी भागवत यांचे आशिर्वचन सुद्धा लाभले आहे.



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला विजयादशमी दिनी शंभर वर्ष पूर्ण होत असून देशात संघ शताब्दी साजरी केल्या जाणार आहे. संघ शताब्दी वर्षात संघ स्वयंसेवकांना तथा सामाजिक क्षेत्रात निःस्वार्थ काम करणाऱ्या कार्यकर्त्यास परीस वेध ग्रंथ शिदोरी ठरणार असून सदर ग्रंथ भारतीय विचार साधनेच्या सर्व केंद्रावर तथा महाराष्ट्रातील बुक्स स्टॉल वर सुद्धा उपलब्ध होणार आहे.

**शब्दांकन - अशोक राणे, अकोला, मो.९४२३६५८३८५**

# श्री संताजी नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत




डाळमंडई येथील तेली पंचाचा वाडा, विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे श्री संताजी नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना हरिभाऊ डोळसे आदी.

नगर - डाळमंडई येथील तेली पंचाचा वाडा, विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे श्री संताजी नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत झाली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक काशिनाथ गाडेकर, संताजी नागरी पतसंस्थेचे चेअरमन सौ. मिरा डोळसे, मानद सचिव हरिभाऊ डोळसे, व्यवस्थापक जब्बारभाई शेख, ऑडिटर प्रमोद वाळके, श्रीराम हजारे, देविदास साळुंखे, गणेश हजारे, संचालक सचिन म्हस्के, सौ.सारीका म्हस्के, शिवा देवकर, सचिन वाघचौरे, उमाकांत डोळसे, पवन साळुंखे, नितीन फल्ले, रमेश बरकसे, अशोक लोखंडे, सोमनाथ देवकर, दिलीप दारूणकर, बाळकृष्ण दारुणकर, श्रीमती निर्मला लोखंडे, नंदू गुरसाळे, संदीप गुरसाळे आदी उपस्थित होते.

चेअरमन मीरा डोळसे म्हणाल्या, सभासद व हितचिंतक यांच्या विश्वासामुळे श्री संताजी नागरी पतसंस्थेचा कारभार पारदर्शी पणे होत असल्याने संस्थेची प्रगती होत आहे. तसेच यावर्षी पतसंस्थेने वसुली मोहीम हाती घेतल्याने कर्ज वसुली चांगल्या पद्धतीने होत आहे. तसेच सभासदांच्या हितासाठी वेळोवेळी निर्णय घेऊन पतसंस्थेची वाटचाल सुरू आहे.

हरिभाऊ डोळसे म्हणाले, संस्थेचा कारभार अत्यंत पारदर्शीपणे व चोखपणे होत असल्याने सभासदांनी संस्थेवर भक्कम असा विश्वास दाखविला आहे. तसेच कर्ज वसुलीसाठी संचालक मंडळांनी योग्य निर्णय घेऊन जंगम जप्तीची मोहीम राबविण्यात आली आहे.तसेच कर्जदार व जामीनदारांवर त्यानुसार कारवाई चालू आहे. संस्थेच्या कर्जाची वसुली मोठ्या प्रमाणात करण्यासाठी संचालक मंडळाने निर्णय घेतला आहे. संस्थेच्या सभासदांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्यामुळेच संस्थेची प्रगती होत आहे. गेल्या वर्षा पासुन महाराष्ट शासन विज बिल भरणा केद्र श्री संताजी नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने माळीवाडातील मे.भाटिया एजन्सी येथे चालु आहे. तसेच ह्या केंद्रात ग्राहकांकरीता बिला मधील नाव बदलणे, पत्ता बदलणे, तसेच नविन वीज कनेक्शन अर्ज इत्यादी सुविधा दिल्या जात आहे. लाईट बिल च्या संदर्भात ग्राहकाच्या सर्व अडचणी दुर केल्या जातील असे श्री.डोळसे यांनी सांगितले आहे.

वार्षिक अहवालाचे वाचन जब्बारभाई शेख यांनी केले. प्रमोद वाळके यांनी आभार मानले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# २५ सप्टेंबर : जागतिक स्वप्न दिन स्वप्नांतून साकार होणारे वास्तव

मानवजातीच्या इतिहासाचा वेध घेतला असता एक गोष्ट स्पष्ट दिसते की जग बदलण्याची, नव्याने घडवण्याची आणि मानवतेला नवी दिशा देण्याची प्रेरणा नेहमीच स्वप्नांतून जन्म घेत आलेली आहे. झोपेत पाहिलेली क्षणभंगुर चित्रे ही खरी स्वप्ने नाहीत, तर जेव्हा एखादी कल्पना, ध्येय किंवा आकांक्षा मनात दृढतेने आकार घेते आणि त्यासाठी व्यक्ती अथवा समाज कृतीशील होतो, तेव्हा त्याला खरे स्वप्न म्हणता येते. हाच संदेश संपूर्ण जगात पोहोचवण्यासाठी दरवर्षी २५ सप्टेंबर रोजी 'जागतिक स्वप्न दिन' साजरा केला जातो. हा दिवस लोकांना त्यांच्या वैयक्तिक व सामूहिक स्वप्नांचा विचार करण्यास, त्यांना कृती आराखड्यात रूपांतरित करण्यास आणि जीवनाला तसेच समाजाला परिवर्तनाच्या मार्गावर नेण्यास प्रेरणा देतो. 'जागतिक स्वप्न दिन' ही संकल्पना प्रथम २०१२ साली अमेरिकन अभ्यासक ओझिओमा एग्वुओनवू (Ozioma Egwuonwu) यांनी मांडली. त्यांना विश्वास होता की प्रत्येक व्यक्तीमध्ये स्वप्न पाहण्याची क्षमता असते आणि ही स्वप्ने वैयक्तिक प्रगतीसोबतच सामाजिक, राष्ट्रीय व जागतिक प्रगतीसाठीही मार्गदर्शक ठरू शकतात. त्यांच्या पुढाकारातून २५ सप्टेंबर हा दिवस अधिकृतपणे 'जागतिक स्वप्न दिन' म्हणून साजरा होऊ लागला. सुरुवातीला शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना आणि काही देशांत या दिवसाचे औचित्य साधून उपक्रम राबवले गेले, पण हळूहळू त्याला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले.

मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून स्वप्ने ही मानवी मनाची प्रेरणाशक्ती आहेत. जेव्हा एखादा युवक आपल्याला डॉक्टर, शास्त्रज्ञ, कलाकार किंवा नेता बनायचे आहे असे स्वप्न पाहतो, तेव्हा तेच स्वप्न त्याच्या अभ्यासाला दिशा देते, जीवनात अनुशासन आणते आणि त्याच्या वर्तनाला नवा अर्थ देते. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहता स्वप्ने ही सामूहिक चेतना घडविण्याचे कार्य करतात. समाजातील मोठ्या आंदोलनांचा आणि क्रांतींचा उगम सामूहिक स्वप्नांतूनच झालेला आहे. महात्मा गांधींनी लोकांच्या मनात स्वराज्याचे स्वप्न रुजवले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समतेचे, न्यायाचे आणि बंधुत्वाचे स्वप्न मांडले, तर नेल्सन मंडेलांनी वर्णभेदमुक्त दक्षिण आफ्रिकेचे स्वप्न लोकांसमोर ठेवले. या सर्व स्वप्नांमधून जनसमूह प्रेरित झाले आणि सामाजिक-राजकीय क्रांती घडून आल्या आहेत.

भारतीय संस्कृतीत स्वप्नांना आध्यात्मिक व तात्त्विक स्थान आहे. संत साहित्यांत स्वप्नांचा उल्लेख अनेकदा येतो. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत कबीर यांनी मानवी मनाला अंतर्मुख होऊन आध्यात्मिकतेचे स्वप्न दाखवले. या स्वप्नांमुळे समाजात नैतिक मूल्यांची रुजवात झाली. आधुनिक काळात मात्र स्वप्ने राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेशी जोडली गेली. पं. नेहरूंनी आधुनिक भारताचे औद्योगिक व वैज्ञानिक स्वप्न पाहिले, तर डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी तरुणाईला विज्ञान-तंत्रज्ञानाच्या आधारे भारताला 'विकसित राष्ट्र' बनविण्याचे स्वप्न दाखवले. डॉ. कलाम यांचे प्रसिद्ध वचन आहे, 'स्वप्न पहा, स्वप्न पहा, स्वप्न पहा. स्वप्ने विचारांमध्ये रूपांतरित होतात आणि विचार कृतीत रूपांतरित होतात.'("Dream, dream, dream; dreams transform into thoughts and thoughts result in action.') हे वचन जागतिक स्वप्न दिनाचा खरा आत्मा स्पष्ट करते.

आजच्या काळात जागतिक पातळीवर असंख्य आव्हाने उभी ठाकली आहेत. गरीबी, भूक, बेरोजगारी, युद्ध, दहशतवाद, हवामान बदल, पाणीटंचाई, प्रदूषण, विषमता, महिलांवरील अत्याचार, बालमजुरी इत्यादी समस्यांनी मानवजातीचे अस्तित्वच धोक्यात आणले आहे. या समस्यांवर मात करण्यासाठी केवळ राजकीय धोरणे किंवा आर्थिक योजना पुरेशा नाहीत, तर सामूहिक स्वप्ने आणि त्यांची पूर्तता करण्यासाठी सर्वसमावेशक प्रयत्न आवश्यक आहेत. उदा. संयुक्त राष्ट्रसंघाने जाहीर केलेली शाश्वत विकास उद्दिष्टे ही प्रत्यक्षात मानवजातीची सामूहिक स्वप्ने आहेत. २०३० पर्यंत सर्व प्रकारची गरीबी नष्ट करणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचवणे, लिंगभाव समानता प्रस्थापित करणे, हवामान बदलावर नियंत्रण ठेवणे, पर्यावरणाचा समतोल राखणे ही उद्दिष्टे म्हणजे मानवतेच्या भविष्यासाठीची स्वप्नेच आहेत. जागतिक स्वप्न दिन या स्वप्नांशी प्रत्येक व्यक्तीला जोडतो.

भारतीय संदर्भात तरुणाई ही देशाची सर्वात मोठी ताकद मानली जाते. भारतातील ६५ टक्क्यांहून अधिक लोकसंख्या ३५ वर्षांखालील आहे. या तरुणाईच्या स्वप्नांमध्ये भारताचे भविष्य दडलेले आहे. शिक्षण, रोजगार, स्टार्ट-अप्स, विज्ञान-तंत्रज्ञान, कला-संस्कृती, क्रीडा यांसारख्या क्षेत्रांत तरुणांनी मोठी स्वप्ने पाहून त्यासाठी झटले तर भारताला जगातील अग्रगण्य राष्ट्र बनविणे अशक्य नाही. मात्र या स्वप्नांना सामाजिक जबाबदारीची जोड देणे अत्यावश्यक आहे. कारण वैयक्तिक स्वप्ने फक्त वैयक्तिक प्रगती घडवतात, पण सामूहिक हिताशी जोडलेली स्वप्ने संपूर्ण समाजाचा कायापालट घडवतात. शिक्षणक्षेत्रात जागतिक स्वप्न दिनाला विशेष महत्त्व आहे. शाळा-महाविद्यालयांत या दिवशी विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनातील ध्येये ठरवण्यास प्रवृत्त केले जाते. अनेक ठिकाणी 'स्वप्न भिंत' (Dream Wall) तयार केली जाते, जिथे विद्यार्थी आपली स्वप्ने लिहून लावतात. ही केवळ कागदावरील नोंद नसून त्यांच्या जीवनयात्रेचा प्रारंभबिंदू ठरते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो, त्यांची सर्जनशीलता वाढते आणि त्यांच्या स्वप्नांना वास्तवात आणण्याची ऊर्जा मिळते. जागतिक स्वप्न दिन आपल्याला अंतर्मुख होण्याची संधीही देतो. आपण आयुष्यात काय साध्य करू इच्छितो? आपली खरी ओढ कुठे आहे? आपले स्वप्न केवळ स्वतःपुरते आहे की त्याचा समाजालाही लाभ होईल? हे प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारले पाहिजेत. कारण समाजहिताशी जोडलेले स्वप्नच खरे परिवर्तन घडवते. महात्मा गांधींचे 'सर्वोदयी समाजाचे स्वप्न', डॉ. आंबेडकरांचे 'समानतेवर आधारित लोकशाहीचे स्वप्न', भगतसिंगांचे 'शोषणमुक्त समाजाचे स्वप्न', अब्दुल कलाम यांचे 'विकसित भारताचे स्वप्न' या सर्व स्वप्नांमधूनच भारताने दिशा घेतली आहे.

आज आपण पाहतो की जगभरातील अनेक आंदोलने, चळवळी आणि मोहिमा प्रत्यक्षात एखाद्या सामूहिक स्वप्नावर आधारलेल्याच आहेत. पर्यावरणवादी ग्रेटा थनबर्ग हिने तरुणांच्या मनात 'हवामान बदलाविरुद्ध कृती'चे स्वप्न जागवले. मलाला युसुफझाई हिने 'प्रत्येक मुलीला शिक्षणाचा अधिकार' या स्वप्नासाठी संघर्ष केला. नेल्सन मंडेला यांनी 'वर्णभेदमुक्त समाजाचे स्वप्न' सत्यात उतरवले. या सर्व उदाहरणांतून स्पष्ट होते की एखादे स्वप्न कितीही अशक्य वाटले तरी सातत्यपूर्ण प्रयत्न, जिद्द आणि एकजुटीने ते वास्तवात उतरविता येते. जागतिक स्वप्न दिनाचा खरा संदेश असा आहे की आपण आपल्या जीवनात ध्येय निश्चित करावे, मोठी स्वप्ने पाहावी, त्या स्वप्नांसाठी योजनाबद्ध प्रयत्न करावेत आणि त्यांना समाजहिताशी जोडावे. वैयक्तिक यशासोबत सामाजिक जबाबदारीची जाण ठेवणारे स्वप्न हेच भविष्यातील जगासाठी उपयुक्त ठरते. स्वप्न म्हणजे केवळ भास नाही, तर ते जीवनाला अर्थ देणारे वास्तव आहे.

शेवटी एवढेच म्हणता येईल की, स्वप्ने नसतील तर कल्पनाशक्तीही मरते आणि कल्पनाशक्तीशिवाय प्रगती शक्य नाही. स्वप्न म्हणजे आशेचा दिवा, प्रगतीचा मार्गदर्शक आणि परिवर्तनाचे साधन. म्हणूनच दरवर्षी २५ सप्टेंबरला साजरा होणारा 'जागतिक स्वप्न दिन' हा केवळ एक औपचारिकता नाही, तर मानवतेच्या सामूहिक आशा-आकांक्षांचा उत्सव आहे. या दिवसाचे औचित्य साधून प्रत्येकाने आपल्या स्वप्नांची उजळणी करावी, त्यांना नवी दिशा द्यावी आणि त्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी एकजुटीने पुढे यावे. कारण स्वप्नांतूनच वास्तव घडते आणि वास्तवातूनच नवी दुनिया साकार होते.



**- डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# मोजका आहार व सदाचार ही निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली

## डॉ. सोनाली बांगर यांचे प्रतिपादन; जिल्हा आयुष रुग्णालयात १० वा राष्ट्रीय आयुर्वेद दिवस साजरा

नगर - योग, प्राणायाम, व्यायाम, मोजका आहार व सदाचार हे निरोगी आयुष्याचे गुपित असल्याचे प्रतिपादन जिल्हा आयुष रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. सोनाली बांगर यांनी केले.



जिल्हा आयुष रुग्णालयात १० वा राष्ट्रीय आयुर्वेद दिन साजरा करण्यात आला.

जिल्हा आयुष रुग्णालयात १० वा राष्ट्रीय आयुर्वेद दिन साजरा करण्यात आला. त्या प्रसंगी डॉ. बांगर बोलत होत्या. कार्यक्रमास स्त्रीरुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षिका डॉ. भारती पेचे, इतिहासतज्ज्ञ भूषण देशमुख, बालरोगतज्ज्ञ डॉ. उज्ज्वला शिरसाठ, भूलतज्ज्ञ डॉ. लक्ष्मी टायरवाले, डॉ. अर्चना लांडे - देशमुख आदी उपस्थित होते.

डॉ. बांगर म्हणाल्या, रुग्णालय सुरू झाल्यापासून आजपर्यंत ७० हजाराहून अधिक नागरिकांनी उपचारांचा लाभ घेतला आहे. उपचारांमध्ये औषधाइतकेच आहार - विहार व मानसिक सदाचारालाही महत्त्व आहे, असे त्यांनी नमूद केले.

'लोक व पृथ्वीच्या आरोग्यासाठी आयुर्वेद' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. अर्चना लांडे - देशमुख म्हणाल्या की, आयुर्वेद केवळ मनुष्यांसाठीच नव्हे तर सर्व सृष्टीसाठी उपयुक्त आहे. निसर्गपूरक आयुर्वेदीय जीवनशैली माणसाचे आरोग्य जपते व निसर्गाचेही संरक्षण करते.

डॉ. भारती पेचे यांनी सांगितले की, आयुर्वेद ही केवळ उपचारपद्धती नसून एक जीवनशैली आहे. आपल्या सण - उत्सवांमधील आचार - विचारांमध्ये आयुर्वेद रुजलेला आहे.

भूषण देशमुख यांनी जिल्ह्यातील प्राचीन औषधी वनस्पतींबाबत माहिती दिली. आयुष रुग्णालय हे आयुर्वेद सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रभावी माध्यम ठरू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

डॉ. उज्ज्वला शिरसाठ म्हणाल्या की, लहान मुलांच्या आरोग्यासाठी पौष्टिक आहार अत्यंत महत्त्वाचा आहे. रोजच्या आहारात फास्टफूड टाळून पचनशक्तीनुसार आयुर्वेद सांगितलेला आहार निश्चित केल्यास मुलांचे आरोग्य चांगले राहते.

सूत्रसंचालन डॉ. शौनक मिरीकर यांनी केले. डॉ. नाझिया शेख यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा आयुष रुग्णालयाच्या डॉ. जयश्री मस्के, डॉ. इर्शाद मोमीन, डॉ. हरलीनकौर पुरी, डॉ. शोभा धुमाळ, अजिंक्य पवार, अविनाश नाबदे, अजिंक्य भिंगारदिवे, हर्षा फाळके, अनिकेत भडके, एलिझाबेथ तेलधुणे, संगीता नन्नवरे, चैतन्य निकम, अश्विनी बोरगे, योगिता कदम, विशाल केदारी, वर्षा जाधव, पूजा भोसले, अश्विनी निमसे, सागर सुळ, विलास कनकुटे आदींनी परिश्रम घेतले.

# नवरात्र उत्सवानिमित्त नगर शहरात २८ सप्टेंबरला दांडिया नाईटचे आयोजन

नगर - शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त शहरातील जिव्हाळा ग्रुप आयोजित व महावीर ग्रुप प्रायोजित दांडिया नाईटचे २८ सप्टेंबर रोजी संध्याकाळी टिळकरोड येथील नंदनवन लॉन येथे आयोजन करण्यात आले आहे. या दांडिया नाईटमध्ये सहभागी होण्याचे आवाहन अध्यक्षा अल्पना कासवा व सचिव सविता काळे यांनी केले आहे.

महिलांनी एकत्र येऊन जिव्हाळा ग्रुपची मुहुर्तमेढ रोवली. या ग्रुपच्या माध्यमातून विविध सामाजिक व धार्मिक उपक्रम राबविण्यात येत आहे. तर विविध सण-उत्सवात महिलांना एक व्यासपीठ निर्माण करुन देण्यासाठी ग्रुपचे कार्य सुरु आहे. या ग्रुपमध्ये जिल्ह्यातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिला जोडल्या गेल्या आहेत. या दांडिया नाईटच्या कार्यक्रमात नवरात्रीनिमित्त दुर्गा पूजा व विविध स्पर्धा रंगणार असल्याची माहिती अल्पना कासवा यांनी दिली.

यामध्ये मिस्टर जिव्हाळा, मिस जिव्हाळा, बेस्ट सोलो डान्सर, बेस्ट कपल डान्स, बेस्ट ड्रेसअप (महिला व पुरुष), बेस्ट ग्रुप डान्स (महिला व लहान मुले), बेस्ट कपल, बेस्ट ड्रेसअप, बेस्ट किड्स डान्सरचे आकर्षक सोने व चांदीचे बक्षिस देण्यात येणार आहे. या दांडिया नाईटचे वैशिष्टये म्हणजे नॉन स्टॉप म्युझिक लाईट, डीजे, एलईडी वॉल स्टेज राहणार आहे. तसेच दहा भाग्यवान विजेत्यांना कुपनच्या लकी ड्रॉ द्वारे बक्षिसे दिले जाणार आहेत.

माहितीसाठी ८७८८५७२२८४; ९९६००७३७७७.

# श्री सत्य साई सेवा संघटना व मानसी डान्स अकॅडमीतर्फे २६ सप्टेंबरला नवरात्र उत्सव; उत्कर्षा धिमते यांचे गायन आणि ८० नृत्यांगनांच्या 'दांडिया - गरब्याने' रंगणार उत्सव

नगर - भगवान श्री सत्यसाईबाबा जन्मशताब्दी वर्षानिमित्त श्री सत्य साई सेवा संघटना आणि मानसी डान्स अकॅडमीच्या वतीने नवरात्र उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उत्सव २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ ते ८ वाजता लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, स्वास्तिक चौक, स्टेशन रोड, अहमदनगर येथे होणार आहे.

कार्यक्रमात गायिका उत्कर्षा धिमते यांच्या मराठी हिंदी गायनावर ८० नृत्यांगना भोंदला, गरबा, दांडिया या नृत्यकलांचा आनंद घेतील. नृत्य साधना आणि तपस्वी योगदानाबद्दल अंजली नृत्यालयाच्या संचालिका श्रीमती सुरेखा डावरे यांचा सन्मान तसेच मानसी डान्स अकॅडमीच्या मानसी देठे यांचा सन्मान विशाल गणपती ट्रस्ट माळीवाडा अध्यक्ष, ॲड.अभय आगरकर यांच्या हस्ते होणार आहे.

कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय किर्तीचे सुफी शास्त्रीय गायक पवन श्रीकांत नाईक उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवेदिका डॉ. प्राजक्ता सावेडकर करणार आहेत.

कार्यक्रमाची प्रेरणा अशोक कुरापट्टी, जिल्हाप्रमुख, श्री सत्य साई सेवा संघटना, अहमदनगर यांच्याकडून मिळाली आहे. हा कार्यक्रम अत्यंत भव्य आणि भक्तिमय असणार आहे आणि श्रद्धावान महिलांना विशेष आमंत्रण देण्यात आले आहे. महिलांनी आपल्या कुटुंबासह या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.


## आनंद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित

नोंदणीकृत कार्यालय चांदेकर चेंबर्स पानसरे गल्ली, अहिल्यानगर ४१४००१
कामकाजाची वेळ : सकाळी १०.३० ते २.०० दुपारी ३.०० ते ५.३०
साप्ताहिक सुट्टी प्रत्येक रविवार तसेच दुसरा व चौथा शनिवार

## ३१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**फक्त सभासदांसाठी**

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २७/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता **श्री ज्ञानेश्वर सभागृह** श्री.गायत्री मंदिराजवळ महाजन गल्ली, अहिल्यानगर या ठिकाणी संस्थेचे चेअरमन मा. श्री. अनिल रायचंद सुराणा यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. सभेची नोटीस सभेची विषय सुची व सभेसंबंधी इतर संपुर्ण माहिती संस्थच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आलेली आहे . तेव्हा कृपया संस्थेच्या सर्व सभासदांनी सदर सभेस अवश्य उपस्थित्त रहावे ही विनंती

दि.२५.०९.२०२५ — मा.कार्यकारिणी मंडळ यांचे सुचनेनुसार
स्थळ- अहिल्यानगर — सही
**दिपक दादासाहेब शिंदे**
व्यवस्थापक


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत संजय मच्छिंद्र कुताळ यांच्या मालकीहक्क कब्जे वहिवाटीची असून सदर मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार विद्यमान मालकाने आमच्या अशिलाबरोबर केलेला आहे. सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोजा नसून सदर मिळकत निर्वेध निजोखमी बोजा विरहित असल्याबाबत विद्यमान मालकाने आमचे अशिलास खात्री व भरोसा दिलेला आहे. तथापी खालील नमुद मिळकतीमध्ये कोणाचाही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, साठेखत, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस,पोटगीहक्क, कुळवहिवाट व इतर कोणताही हक्क हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ **दिवसांचे** आत संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर कोणाचीही कोणतीही हरकत अगर तक्रार विचारात घेतली जाणार नाही, अगर चालणार नाही तसेच आमचे अशिल व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन :-** जिल्हा अहमदनगर पो.तु.ता. नगर पैकी **अहमदनगर जिल्हापरिषद हद्दीतील मौजे शिराढोण** येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| गट नं. | क्षेत्रफळ |
|---|---|
| २५४/१ | २हे=८९आर+पो.ख-०१ आर |

**यापैकी २ हे-० १.९० आर यापैकी पश्चिमेकडील पुर्व-पश्चिम ०हे-९ ० आर हे क्षेत्र. यांसी चर्तु:सिमा-**

पुर्वेस - गट नं.२५४/१ पैकी नगर परळी रेल्वे लाईन — दक्षिणेस - गट नं. २५४/२
पश्चिमेस - गट नं. २५४/१ पैकी — उत्तरेस - शिराढोण उक्कडगाव शिव

**ॲड. श्री. चोथे रविंद्र एन.**
ऑफिस - २०९ ॲडव्होकेट चेंबर्स, जुने जिल्हा न्यायलय कंम्पाऊन्ड, अहिल्यानगर
मो.नंबर: ९९२२२४०१७१

तारीख :- २५/०९/२०२५
अहिल्यानगर



श्री छत्रपती अभियांत्रिकी मध्ये 'एन एस एस डे' उत्साहात साजरा कण्यात आला.

# श्री छत्रपती अभियांत्रिकी मध्ये 'एनएसएस डे' उत्साहात

नगर - २४ सप्टेंबर हा दिवस दरवर्षीप्रमाणे या वर्षी देखील राष्ट्रीय सेवा योजना दिवस म्हणजेच एनएसएस डे म्हणून नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी, शिक्षकांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन या संपूर्ण आठवड्यामध्ये करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य उद्दिष्ट महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करून त्यांना सामाजिक कार्याचा सराव करण्यास वाव देणे, असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी या कार्यक्रमानिमित्त व्यक्त केले.

या सात दिवसाच्या कालावधीमध्ये २३ सप्टेंबर रोजी 'संशोधन पद्धती' या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी नगरमधील लेखक व इंजिनियर राजेंद्र मुळे हे व्याख्याते उपस्थित होते. सरदार वल्लभभाई पटेल, कारगिल विजय दिवस, आर्टिकल ३७० अशा विषयांवर प्रश्नमंजुषा विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली. विजयी विद्यार्थ्यांना पारितोषिक देखील देण्यात आले. २४ सप्टेंबर रोजी 'स्वच्छता हीच सेवा' या मोहिमेंतर्गत महाविद्यालय परिसर स्वच्छता हा उपक्रम हाती घेण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक विद्यार्थ्यांबरोबरच महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनीही यामध्ये सहभाग नोंदवला. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे समाजामधील मोलाचे कार्य, अंत्योदय दिवस अशा विषयांवर पोस्टर मेकिंग कॉम्पिटिशन चे २५ सप्टेंबर रोजी आयोजन करण्यात आले. तसेच २६ ते २९ सप्टेंबर दरम्यान प्लास्टिक निर्मूलन, घनकचरा व्यवस्थापन याविषयी सेमिनारचे आयोजन, गड किल्ले संवर्धन अंतर्गत शिवनेरी किल्ला या ठिकाणी सहल, आरोग्य तपासणी शिबिर, अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन देखील करण्यात आले आहे. प्रत्येक कार्यक्रमास सहभाग विद्यार्थ्यांचा लाभल्यामुळे राष्ट्रीय सेवा योजना दिवसाचे उत्साहाने साजरी करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली.

या विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यासाठी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. अक्षय देखणे, प्रा. अमेय कुलकर्णी, प्रा. अक्षय कांबळे, प्रा. प्रसाद मुटकुळे यांचे सहकार्य लाभले.






## जाहीर नोटीस

तमांम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलाबरोबर सौदा करून विसारा पोटी रक्कम घेवून सदर मिळकत कायमखूष खरेदी देण्याचे कबूल केले आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, दावा,मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ **दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट** : डि.।। अहमदनगर सब डि.।। तालुके नगर पैकी अहिल्यानगर जिल्हापरिषद हद्दीतील **मौजे नागरदेवळे** येथील मे. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील प्लॉट मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

| | स.नं. | प्लॉट नंबर | चौ.मी. |
|---|---|---|---|
| १. | २४२/१ | १३३ | २३२.०० |

**विद्यमान मालक नं. १ ते ४ यांच्या मालकीचा संपुर्ण प्लॉट मिळकतीबाबत.**

**यांसी चतु:सिमा-**
पुर्वेस - ९ मी रस्ता — दक्षिणेस - प्लॉट नंबर १३२
पश्चिमेस - प्लॉट नंबर १३४ उत्तरेस - ६ मी. रस्ता

| | स.नं. | प्लॉट नंबर | चौ.मी. |
|---|---|---|---|
| २. | २४२/१ | १३४ | १६०.०० |

**विद्यमान मालक नं. १ यांच्या मालकीचा संपुर्ण प्लॉट मिळकतीबाबत. यांसी चतु:सिमा-**
पुर्वेस - प्लॉट नंबर १३३ — दक्षिणेस - प्लॉट नंबर १३१
पश्चिमेस - प्लॉट नंबर १३५ — उत्तरेस - रस्ता

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक संपुर्ण प्लॉट मिळकत त्यामधील तदंगभूत वस्तुसह, समाईकातील हक्क व सुविधांसह व इतर हक्कासह काहीही एक राखुन न ठेविता .

**विद्यमान मालक : १.सुजाता भीमराज पाडळे २.अमोल भीमराज पाडळे ३.कोमल भीमराज पाडळे ४.आकाश भीमराज पाडळे,**
पत्ता - सर्व रा.नागरदेवळे, अहिल्यानगर

**ॲड. सचिन आसाराम भोजने**
**ॲड. प्रियंका अण्णासाहेब खाटेकर**
गुरु प्रसाद अपार्टमेंट,पाईप लाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर,
मो. ८७८८५५४२९१,९८८१३९८८४१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत **गुरुविंदसिंग चरणसिंग विरदी,** रा. चास, ता.जि.अहिल्यानगर यांचे मालकी वहिवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष ताब्यामध्ये आहे. सदर मिळकत खरेदी करणे विषयी आमच्या अशिलांची सदर मिळकतीचे विद्यमान मालकांबरोबर करार झाला असून विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांकडून विसाराची रक्कम सुध्दा स्वीकारली आहे. सदर मिळकत ही पूर्णत : निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व भरवसा मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशीलास दिलेला आहे. याउपरही सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, पोटगी, लिज, लीन, करार, कोर्ट केस, वाद विवाद, साठेखत, कुलमुखत्यारपत्र किंवा अन्य कोणत्याही प्रकारे क्लेम, हक्क किंवा बोजा असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे. आत सर्व मुळ, कागदोपत्री ' पुराव्यानिशी रजिस्टर अे.डी.पोस्टाने खालील दिलेल्या पत्यावर खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजून व ज्यांचे कोणाचे काही हक्क असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले असल्याचे समजून आमचे अशील पुढील व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन :-**
जिल्हा तुकडी अहिल्यानगर पो.तु.ता.नगर पैकी, अहिल्यानगर जिल्हा परिषद हद्दीतील तसेच मा.दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे चास येथील गट नं. ८३९/२ याचे एकुण बिनशेती क्षेत्र १९७५.०० चौ.मी. याचा बिनशेती आकारणी ३८.५० यावर बांधलेल्या बंगला मिळकत व बांधलेल्या खोल्यांसह तसेच गट नं.८३९ मध्ये एक विहीर असून ति व तिचे पाणी हिश्याप्रमाणे वापरण्याचे हक्कासह

**यांसी चतु:सिमा-**
पुर्वेस - गट नं.८३८ पैकी क्षेत्र, — दक्षिणेस - ओढा,
पश्चिमेस - रस्ता — उत्तरेस - गट नं.८३९ पैकी क्षेत्र
येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक मिळकत तदंगभुत वस्तुसह वागणुकीचे व वहिवाटीचे सर्व हक्कासह काही एक राखुन न ठेविता मिळकतीचे वर्णन असे.

अहिल्यानगर
२५/०९/२०२५

**ॲड. समीर.एस.सोनी**
आडते बाजार, अहिल्यानगर






# अहिल्यानगरमध्ये २७ सप्टेंबरला जिल्हास्तरीय मराठी काव्य संमेलन आणि एकपात्री अभिनय, नऊवारी वेशभूषा स्पर्धा

नगर - विश्वात्मक मराठी साहित्य कट्टा मंचच्यावतीने अहिल्यानगर जिल्हास्तरीय मराठी काव्य संमेलन आणि एकपात्री अभिनय, नऊवारी वेशभूषा स्पर्धेचे आयोजन २७ सप्टेंबर रोजी करण्यात आले आहे.

नवरात्रौत्सवानिमित्त महिलांसाठी खास नऊवारी वेशभूषा स्पर्धाही यावेळी आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमातील सहभाग सर्व वयोगटातील व्यक्तींसाठी विनामुल्य असून नावनोंदणीसाठी उपक्रम समन्वयक अनिकेत सुपेकर (७३०४९६५९१०) यावर संपर्क करावा.

सकाळच्या सत्रात काव्यसंमेलन, दुपारच्या सत्रात एकपात्री अभिनय स्पर्धा तर संध्याकाळच्या सत्रात नऊवारी वेशभूषा स्पर्धा होणार आहेत. उत्कृष्ट १० काव्य सादरीकरण, १० अभिनय आणि १० नऊवारी वेशभूषांना गौरवपदक, मानपत्र, शाल आणि श्रीफळ देवून गौरविण्यात येणार आहे. सहभागी सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येतील. चितळे रोड येथील जिल्हा वाचनालय येथे या स्पर्धा होतील. ज्येष्ठ कवयित्री श्रीमती हेमलता गिते यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार असल्याची माहिती संयोजन प्रमुख शिवराज कृष्णा यांनी दिली.

# सोलर ग्राहकांच्या वीजबिलातील अनियमितता लवकरच मार्गी लागणार

### अमित काळे यांची माहिती

नगर – विजेची वाढती गरज त्याचप्रमाणे वाढते वीजदर लक्षात घेऊन वीज बिल कमी होईल या आशेने अनेक ग्राहक, उद्योजक, व्यावसायिक आपापल्या छतावर सोलर सिस्टिम बसवित आहेत. परंतु अनेक ग्राहकांना अनियमित, वाढीव वीज बिल येते आहे. या संदर्भात ऑफ इंडिया रिन्युएबल एनर्जी असोसिएशनने या सौर व्यावसायिक संघटनेने महावितरणचे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण यांच्याशी संपर्क साधून ग्राहक तसेच सौर व्यावसायिकांना येणाऱ्या अडचणींबद्दल विस्तृतपणे सांगितले. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून महावितरणने तातडीने बैठक बोलावून ताबडतोब उपाययोजना करण्याचे आदेश अहिल्यानगरचे अधीक्षक अभियंता रमेशकुमार पवार यांनी मंडळ कार्यालयात झालेल्या बैठकीमध्ये संबंधित एजन्सीला दिले. यामुळे बिलातील अनियमितता आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या तक्रारींचा प्रश्न मार्गी लागणार असल्याचे संघटनेचे जिल्हा संचालक अमित काळे यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, महावितरणने सर्व सोलर ग्राहकांना आधुनिक स्मार्ट मीटर बसविण्याचे कंत्राट एनसीसी लिमिटेड या कंपनीस दिले आहे. मीटर बसविण्यात आल्यानंतर आधीचे रिडिंग, नवीन मीटर



इंडिया रिन्युएबल एनर्जी असोसिएशनने सौर व्यावसायिक संघटनेने महावितरणचे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण यांच्याशी संपर्क साधून ग्राहक तसेच सौर व्यावसायिकांना येणाऱ्या अडचणी सांगितल्या.

आणि इतर माहिती भरून ते ऑनलाइन करणे अपेक्षित आहे. तसेच ग्राहकांकडून काढलेले मीटर संबंधित महावितरण कक्ष कार्यालयात जमा करणे, या कामांचा समावेश कंत्राटामध्ये आहे. परंतु गेली ५–६ महिन्यांपासून संबंधित एजन्सीने कामात कुचराई केली असून त्याचा भूर्दंड ग्राहकांना बसत आहे. एजन्सीने तांत्रिक अडचणी येत असल्याचे सांगितले आहे परंतु या अडचणी अनेक दिवसांपासून प्रलंबित आहेत. त्यांनी काम पूर्ण न केल्याने पुढील बिलिंग होत नाही. यामुळे सरासरी बिल येते. हे बिल जर भरले नाही तर ग्राहकाच्या अनामत रक्कमेतून ही वजावाट होते. पुढील येणाऱ्या बिलामध्ये अनामत रक्कम इतर चार्जेसच्या रूपात दर्शविली जाते. याचा एकत्रित परिणाम म्हणून बिलांच्या रकमेत भरमसाठ वाढ झाली आहे. अकारण अवाजवी बिल आल्यामुळे ग्राहकांमध्ये सौरव्यावसायिकांप्रती गैरसमज निर्माण होतो आहे. परंतु एजन्सीच्या अकार्यक्षमतेचा फटका सौर व्यावसायिक ग्राहक आणि महावितरण या तिघांना बसत असल्याचे सांगितले.

यावेळी बैठकीस अधीक्षक अभियंता रमेश पवार, कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण, अतिरिक्त कार्यकारी अभियंता भाऊसाहेब कुमावत, एजन्सीचे प्रतिनिधी, सौर व्यावसायिक आणि ग्राहक उपस्थित होते.

# कल्याण महामार्गावरील सीना नदीवरील उड्डाणपुलाचे काम त्वरित पूर्ण करा

### सौ. स्वाती सिरसुल यांची मागणी



नगर – गेल्या दीड ते दोन वर्षांपूर्वी सुरू करण्यात आलेल्या नालेगावजवळील कल्याण महामार्गावरील सीना नदीवरील उड्डाणपुलाचे काम अद्यापही प्राथमिक अवस्थेतच आहे. कामाचा वेग अत्यंत मंद असून पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांचे हाल वाढले आहेत. या पुलाचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी सौ. स्वाती सिरसुल यांनी केली आहे.

गेल्या चार–पाच दिवसांपासून नगर शहर व परिसरात मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले आहे. सीना नदीला महापूर आल्याने महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे कोलमडली आहे. नदीपलीकडील आदर्शनगर, श्रीकृष्णनगर, विद्यानगर, साईराम सोसायटी, जाधवनगर व शिवाजीनगरसारख्या वस्त्यांमध्ये हजारो लोक राहतात. रोजगार व कामानिमित्त रोज शहरात ये–जा करणाऱ्या गोरगरिबांचा संपर्क तुटल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. विशेषतः शिवाजीनगर भागातील मजुरांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

दरम्यान, सीना नदी दुथडी भरून वाहत असल्याने शिवाजीनगर परिसरातील गटार व चेंबरमधून पाणी उलट दिशेने घरात शिरत आहे. अनेक सोसायटींमध्ये घाणीचे पाणी गुडघ्यापर्यंत साचल्याने रहिवासी हैराण झाले आहेत. नवरात्रीच्या दिवसांत घराघरांत चालणारे पूजन–पाठ पाण्याखाली गेल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. देव पाण्याखाली गेले, आता सामान्यांच्या व्यथा कोण ऐकणार? असा प्रश्नही नागरिकांनी उपस्थित केला आहे.

कल्याण–विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्गाची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत आहे. रस्त्यावरील खड्डे व चिखलामुळे पादचारी व वाहनधारकांचे अपघात वाढले आहेत. महामार्गावर माळशेज घाट, कल्याण, भिवंडी, मुंबई, शिर्डी, पुण्याकडे जाणारी मोठ्या वाहनांची रहदारी सुरूच असते. नुकत्याच झालेल्या गणेशोत्सवातील विसर्जनानंतर नदीकाठी जमा झालेला गाळ, मूर्ती व प्लास्टर ऑफ पॅरिसचा चिखल रस्त्यावर टाकण्यात आला. मुसळधार पावसामुळे हा गाळ रस्त्यावर पसरला असून त्यातून दुर्गंधी निर्माण झाली आहे. मोकाट जनावरे व कुत्र्यांची रेलचेल वाढल्याने दातरंगे मळा, नालेगाव भागातील नागरिक आरोग्य धोक्याबाबत चिंतेत आहेत.

गेल्या दोन दिवसांपासून सीना नदीतील पाण्याची पातळी वाढल्याने नालेगाव व वारोळामारुतीजवळील जुना पूल पूर्णपणे पाण्याखाली गेला आहे. त्यामुळे कल्याण महामार्गावरील माधवनगर मार्गे बायपासने होणारी वाहतूक बंद झाली आहे. या भागातील रहिवासी नदीच्या पलीकडे अडकून पडले असून नगर शहरातील नागरिकांनाही पलीकडे जाता येत नाही.

या गंभीर परिस्थितीत नागरिक त्रस्त झाले आहेत. म्हणूनच सीना नदीवरील उड्डाणपुलाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करून, नदीपलीकडील नागरिक व हजारो वाहनधारकांना दिलासा द्यावा, अशी मागणी सौ. स्वाती सिरसुल यांनी प्रशासनाकडे केली आहे. त्यांनी, समस्या डोळ्यांसमोर असूनही प्रशासन मौन बाळगून बसले आहे. काम गतीने पूर्ण झाले नाही, तर सामान्य जनतेचे जगणे कठीण होईल, अशी खंत व्यक्त केली आहे.

# सावेडी परिसरातील पाणीपुरवठा विस्कळीत; तातडीने उपाययोजना करा अन्यथा आंदोलन

नगर – सावेडी परिसरातील एकविरा चौक ते पारिजात चौक, अष्टविनायक अपार्टमेंट व समतानगर भागातील नागरिकांना मागील काही महिन्यांपासून विस्कळीत पाणीपुरवठ्याचा सामना करावा लागत आहे. डी.पी. रस्त्यावरील कॉंक्रिटीकरण तसेच जलवाहिनी दुरुस्तीच्या कामामुळे या भागातील पाणीपुरवठा अनियमित झाला असून, नागरिकांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. या समस्येबाबत माजी नगरसेविका शोभा बोरकर यांनी महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे परिमल निकम यांना निवेदन दिले. यावेळी माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर, स्वप्निल साबळे, किरण पवार आदी उपस्थित होते.



सावेडी परिसरातील पाणीपुरवठ्याबाबत तातडीने उपाययोजना कराव्या याबाबत पाणीपुरवठा विभागाचे परिमल निकम यांना निवेदन देताना माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर आदी.

निवेदनात म्हटले आहे की, डी.पी. रोडलगत अनेक सोसायट्या, कॉलनी, शाळा व कॉलेज परिसरांमध्ये दररोज पाणीपुरवठा न होता तीन–चार दिवसांनीच पाणी मिळते, तर काही ठिकाणी अजिबातच पाणी येत नाही. त्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

शोभा बोरकर यांनी तातडीने पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली असून, अन्यथा नागरिकांचा मोर्चा महानगरपालिकेवर काढण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

# श्रीगोंदा येथे २८ सप्टेंबरला राज्यस्तरीय पारधी युवक–युवती निर्धार परिषद

### अंधश्रद्धा व जातपंचायतीला मूठमाती देण्याचा संकल्प

नगर – सावित्रीबाई फुले संविधान गट आणि संजीवनी संविधान गट यांच्या संयुक्त विद्यमानाने राज्यस्तरीय पारधी युवक–युवती निर्धार परिषद आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद २८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता श्रीगोंदा येथे खासदार निलेश लंके, अनुसूचित जाती जमाती आयोगचे सचिव गोरक्ष लोखंडे, जिल्हाधिकारी पंकज आशिया, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या उपस्थितीत होणार आहे.

अंधश्रद्धा व जातपंचायतीला मूठमाती हा या परिषदेचा प्रमुख हेतू असून पारधी समाजात संविधानिक हक्कांची जागृती करून शिक्षण, आरोग्य, रोजगार व निवारा या मूलभूत हक्कांबाबत युवक–युवतींनी ठोस निर्धार करणे, हे या परिषदेमागचे उद्दिष्ट आहे. गेल्या तीन वर्षांपासून श्रीगोंदा तालुक्यात संविधान जागृतीचे कार्य सुरू असून बेलवंडी व घारगाव येथे संविधान गट उभारून विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या कार्यातून पारधी समाजातील शिक्षणाचा अभाव, आरोग्य व निवाऱ्याच्या समस्या, रोजगाराच्या संधींचा अभाव, अंधश्रद्धा आणि जातपंचायतीचे बंधन अशा गंभीर प्रश्नांचा उलगडा झाला. परिषदेच्या माध्यमातून युवक–युवतींकडून खालील मागण्यांवर ठाम भूमिका घेण्यात येणार आहे. अंधश्रद्धा, क्रूर प्रथा व जातपंचायतीविरोधात जनजागृती, बालविवाह व कौटुंबिक हिंसेस विरोध, महिलांवरील अन्यायकारक बंधनांचा निषेध, पारधी मुलींचे किमान बारावीपर्यंत शिक्षण व उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन, रोजगारासाठी शासन योजनांची प्रभावी अंमलबजावणी, आरोग्य शिबिरे व योजना यांची माहिती समाजापर्यंत पोहोचवणे, गायरान जमिनीवरील अतिक्रमणे नियमित करून घरे व जमिनी पारधी समाजाच्या नावावर करणे या परिषदेतील युवक–युवती समाजपरिवर्तनाचा संकल्प करणार असून स्त्री–पुरुष समानता, संविधानिक मूल्यांचा प्रसार आणि पारधी समाजाला मुख्य प्रवाहात आणणे हेच प्रमुख ध्येय ठरणार आहे. आयोजकांनी पारधी समाजातील बांधव व भगिनींनी परिषदेला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# भिंगार उपनगरात २६ सप्टेंबर रोजी उदे ग अंबे उदे भक्तिसंगीताची मैफल

भिंगार – नवरात्रोत्सवानिमित्त चौंडेश्वरी मंदिर ट्रस्ट आयोजित ओंकार संगीत निकेतन प्रस्तुत उदे ग अंबे उदे हा देवीवरील विशेष भक्तिसंगीताचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात ओंकार संगीत निकेतनचे पंचवीस विद्यार्थी भक्तीगीते, गोंधळ, भारुड आणि गवळण अशी बहारदार मैफल सादर करणार आहेत. या कार्यक्रमाला मार्गदर्शन व संवादिनी साथ सौ. संगीता देऊळगांवकर यांची लाभली असून, तबला साथ वैष्णवी कोल्हे व अनुज दरवडे करणार आहेत, तर तालवाद्य साथ विराज गावंडे व राधिका कोल्हे करणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जान्हवी देऊळगांवकर करणार आहेत. हा कार्यक्रम चौंडेश्वरी मंदिर, सरपण गल्ली, भिंगार येथे २६ सप्टेंबर रोजी सायं. ४ वाजता आयोजित करण्यात आला असून, देवीभक्तांनी उपस्थित राहून या भक्तिमय सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष व संचालक मंडळातर्फे करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिकारी संघाची अहिल्यानगर जिल्हा कार्यकारणी जाहीर

नगर – अहिल्यानगर जिल्हा संघाची जिल्हा कार्यकारिणी राज्याध्यक्ष तात्यासाहेब पाटील यांनी दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली २१ सप्टेंबर रोजी घोषित करण्यात आली. तसे पत्र राज्य संघाच्या वतीने जिल्हा अध्यक्ष यांना देण्यात आले. ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाचे अनेक प्रलंबित प्रश्न सोडवण्याची जबाबदारी ही सदर जिल्हा कार्यकारणी वर असणार आहे. त्यामुळे सर्वांनी एकजुटीने काम करावे असे जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर सुर्वे यांनी सांगितले. अशी माहिती प्रसिध्दी प्रमुख कार्यकारिणी सदस्य यांनी दिली


"हर काम देश के नाम"

## अहिल्यानगर छावनी परिषद

एएमएक्स चौक, कैम्प भिंगार, अहिल्यानगर – ४१४००२

Email : ahmedngrcantt@gmail.com Website: ahmednagar.cantt.gov.in

### कोटेशन सूचना

अहिल्यानगर छावणी परिषद, अहिल्यानगर क्षेत्र व परिसरातील सर्व लोकांना या सुचनेद्वारे कळविण्यात येते की, खालील दर्शविलेल्या बाबींचा ठेका मोहरबंद कोटेशन पध्दतीने छावणी परिषदेने देण्याचे ठरविले आहे. तरी इच्छुक ठेकेदारांनी खालीलप्रमाणे कोटेशन मागवत आहे.

| अ. क्र. | तपशील | कालावधी | बयाना रक्कम | फार्म फी |
|---|---|---|---|---|
| ०१ | छावणी क्षेत्रामध्ये फटाक्यांचे स्टॉल लावणे. १० X १० चे १२ स्टॉल, | १० दिवस दि. १५/१०/२०२५ ते २४/१०/२०२५ | रु. २०००/- | रु. २१०/- (जीएसटीसह) |

**छावणी परिषद कोटेशनची कुठलीही बोली स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क राखुन ठेवत आहे.**

कोरे कोटेशन फॉर्म छावणी परिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत रु. २१०/- भरुन दिनांक ३०/०९/२०२५ रोजी दुपारी ०३.०० पर्यंत उपलब्ध राहतील. भरलेले मोहरबंद कोटेशन फॉर्म दोन पाकीट पध्दतीने दि. ०१/१०/२०२५ दुपारी १२.०० वाजेपर्यंत छावणी परिषद कार्यालयातील निविदा पेटीत जमा करावेत.

सदरहु स्टॉलसाठी छावणी परिषद, अहिल्यानगर यांचेमार्फत जागा दिली जाईल. त्याशिवाय छावणी परिषद क्षेत्रातातील अन्यत्र कोठेही फटाके व तत्संबंधी स्फोटक वस्तु विक्रीसाठी ठेवण्यात आल्यास पूर्वसूचना न देता सदरचा माल जप्त करण्यांत येईल याची कृपया नोंद घ्यावी.

(विक्रांत मोरे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
छावणी परिषद, अहिल्यानगर

क्र.अह./राजस्व/फटाका स्टॉल/२०२४-२५
दि. २३/०९/२०२५



## महाराष्ट्र शासन
## रो.ह.यो.(कार्य).विभाग अहिल्यानगर

पत्ता : बांधकाम भवन नगर, औरंगाबाद रोड, अहिल्यानगर

ईमेल पत्ता :- egsahmednagar.ee@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक ०२४१–२४२२९२८

### निविदा सूचना क्र. ०३ सन २०२५–२०२६

कार्यकारी अभिवंता, रोहयो (कार्य) विभाग, अहिल्यानगर हे खालील कामांच्या सिलबंद ब–१ निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक ०३/१०/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत मागवित आहेत. कार्यकारी अभियंता, रोहयो (कार्य) विभाग, अहिल्यानगर यांच्या कार्यालयांकडे दिनांक २५/०९/२०२५ ते ०३/१०/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत कोरे निविदा संच मिळविण्यासाठी (शासकिय सुट्टीचे दिवस सोडून) कोरे निविदा संचाच्या किंमतीसह व सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीपत्रासह (सत्यप्रत) लेखी अर्ज करावा. संपूर्ण तपशिलाकरिता या कार्यालयाच्या सूचना फलकावर सविस्तर निविदा सूचना पहावयास अगर विनंती केल्यास विनामुल्य मिळू शकेल. कोणतेही कारण न दाखवता कोणतीही किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. सदर कामांच्या निविदे किंमतीमध्ये वस्तू व सेवाकर समाविष्ठ केलेला नाही. सदर वस्तू व सेवाकर स्वतंत्रपणे अदा करण्यात येईल, यांची नोंद घ्यावी, त्यानुसार ठेकेदारांनी दर सादर करतांना वस्तु व सेवाकर वगळून दर सादर करावेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत लाखात | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|
| १ | मौजे आव्हाणे खुर्द येथील लक्ष्मीआई मंदिरासमोरील ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ६०१ वर सभामंडप बांधकाम करणे. ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर (लेखाशिर्ष :– ४५१५ आमदार निधी) | रु.८.४३ | वर्ग व VII त्यावरील |
| २ | Construction of CC Road from Divekar Ghar to Kharde road in Tarkesh Nagar at Malibabhulgaon,Tal. Pathardi, Dist. hilyanagar. (२५५३ खासदार स्थानिक विकास कार्यक्रम) | रु.४.२१ | वर्ग व VII त्यावरील |
| ३ | प्रभुवडगाव येथे गौतमनगर १ अंतर्गत समाजमंदिर बांधणे, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर, (भारतरत्न डॉ. वावासाहेव आंबेडकर सामाजिक विकास योजना) | रु.७.९६ | वर्ग व VII त्यावरील |

| | | |
|---|---|---|
| निविदा उपलब्ध कालावधी | :– | दिनांक २५/०९/२०२५ ते दिनांक ०३/१०/२०२५ |
| निविदापूर्व बैठक | :– | निरंक |
| निविदा उघडणे | :– | दिनांक: २३/१०/२०२५ |

जा.क्र.लेखा/निविदा/३९३८/सन २०२५
कार्यकारी अभियंता यांचे कायालय
रो.ह.यो.(कार्य), विभाग,
अहिल्यानगर दिनांक : १९/०९/२०२५

जिमाका/नगर/जाहि/१२५/२०२५

**कार्यकारी अभियंता**
रो.ह.यो. (कार्य) विभाग,
अहिल्यानगर


# अहिल्यानगर जिल्ह्यासाठी २६ ते २८ सप्टेंबर दरम्यान पावसाचा 'यलो अलर्ट' : हवामान विभागाचा अंदाज

नगर – भारतीय हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार २६ ते २८ सप्टेंबर या कालावधीत अहिल्यानगर जिल्ह्यात वीजांचा कडकडाट, जोरदार वारे व मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी 'यलो अलर्ट'जारी करून नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

### नद्यांच्या विसर्गात वाढ; पूरस्थितीचा धोका

पुणे, नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यातील धरणांमधून पाण्याचा विसर्ग वाढला असून त्यामुळे जिल्ह्यातून वाहणाऱ्या नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत आहे. नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे.

सध्या भिमा नदीवर दौंड पूल येथे १५,३८५ क्युसेक, गोदावरी नदीवरील नांदूर मध्यमेश्वर धरणातून ६,३१० क्युसेक, जायकवाडी धरणातून ३७,७२८ क्युसेक, प्रवरा नदीवरील ओझर बंधारा १,१५६ क्युसेक, मुळा धरणातून १,२०० क्युसेक, घोड धरणातून ५,००० क्युसेक, सीना धरणातून ४,६०४ क्युसेक, कुकडी नदीवरील येडगांव धरणातून ५०० क्युसेक, हंगा नदीवरील विसापूर धरणातून ६५० क्युसेक, खैरी धरण येथून ९२२ इतका विसर्ग सुरू आहे.

### प्रशासनाकडून नागरिकांना सूचना

मेघगर्जनेच्या वेळी, विजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा.

गडगडाटीच्या वादळादरम्यान व विजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये, वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा, ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल / सायकल यांचेपासून दूर रहावे.

मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत / दिव्यांचे खांब, धातूचे कुंपण, विदयुतवाहिनी अथवा ट्रॉन्सफॉर्मजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या / लोंबणाऱ्या केबल्स् पासून दूर रहावे.

जाहिरात फलक (होर्डिंग्ज) कोसळून होणाऱ्या दूर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून जाहिरात फलकांच्या (होर्डिंग्ज) आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी,

विजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.

धरण व नदीक्षेत्रामध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी, धरणाचे पाण्यात वा नदीच्या पाण्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये, धोकादायक ठिकाणी सेल्फी (Selfie) काढू नये.

नदी, ओढे व नाल्याकाठच्या नागरिकांनी दक्ष रहावे. पाणीपातळीत वाढ होत असल्यास नागरिकांनी नदीपात्रापासुन तसेच ओढे व नाले यापासून दूर रहावे व सुरक्षीत स्थळी स्थलांतर करावे. नदी, ओढे–नाल्यांवरील पुल व बंधा–यांवरुन पाणी वाहत असल्यास पुल/बंधारे ओलांडू नये.

नागरिकांनी स्थानिक प्रशासनाने दिलेल्या सुचनांचे पालन करावे. आपत्कालीन परिस्थिती उद्भवण्यापूर्वीच सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे.

जुनाट/मोडकळीस आलेल्या व धोकादायक इमारतीमध्ये आश्रय घेऊ नये.


अतिवृष्टीमुळे भूस्खलन होण्याची व दरडी कोसळण्याची शक्यता असते. त्यादृष्टीने डोंगराच्या पायथ्याशी राहणाऱ्या लोकांनी दक्षता घ्यावी व वेळीच सुरक्षीत स्थळी स्थलांतर करावे. घाट रस्त्याने प्रवास करणे शक्यतो टाळावे.

### जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे

जिल्हा नियंत्रण कक्षाचा टोल–फ्री क्रमांक १०७७ असून दूरध्वनी क्रमांक ०२४१–२३२३८४४ व २३५६९४० उपलब्ध आहेत, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# सीना नदी पुलाच्या कामाला गती देवून वारुळाचा मारुती पुलाची उंची व रुंदी वाढवा

नगर – कल्याण रोड सीना नदी पुलाच्या कामाला गती द्यावी व वारुळाचा मारुती पुलाची उंची वाढवावी. याबाबत नालेगांव, कल्याण रोड, दातरंगेमळा, वारुळाचा मारुती परिसरातील नागरिकांच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांना निवेदन राष्ट्रवादीचे प्रा.अरविंद शिंदे, माजी नगरसेविका रजनी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. यावेळी देविदास ठाणगे, संतोष लांडे, संदीप गीते, शरद दातरंगे, अशोकराव घोडके, हरिभाऊ येलदंडी, रोहन शिरसाठ, दत्ता ठाणगे, संजय शेळके, आदित्य शिंदे, प्रथमेश गायकवाड, परेश पुरोहित, अनिकेत चव्हाण, भाऊसाहेब घोडके, अनमोल वाडेकर, भूषण गारुडकर आदींसह कल्याण रोड, वारुळाचा मारुती नालेगाव, दातरंगे मळा परिसरातील नागरिक आदी उपस्थित होते.



कल्याण रोड सीना नदी पुलाच्या कामाला गती द्यावी व वारुळाचा मारुती पुलाची उंची वाढवावी. याबाबत नालेगाव परिसरातील नागरिकांच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांना निवेदन देण्यात आले. (छाया – लहू दळवी)

अहिल्यानगर शहरात पावसाने धुमाकूळ घातला आहे. सतत पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे सिना नदीला तीन दिवस आलेला पूर यामुळे कल्याण रोडवरील नदी पुलाचा रस्ता तीन दिवस बंद होता. तसेच वारुळाचा मारुती येथील पुलावरून पुराचे पाणी गेल्याने वारुळाचा मारुती परिसरातील व कल्याण रोड परिसर येथील नागरिकांचा नगर शहराशी दळणवळणाचा संपर्क पुर्णपणे तुटला होता. वारुळाचा मारुती रस्ता सिना नदीवरील पूल आमदार जगताप महापौर असताना सौ.रजनी शिंदे व प्रा.अरविंद शिंदे यांनी प्रयत्न करुन आपल्या सहकार्याने वारुळाचा मारुती नदीवरील पूल तयार झाला होता.

सध्याची पूराची पाण्याची पातळी पहाता तो पूल दळणवळणाच्या दृष्टीने छोटा पडत आहे. तरी आपण महाराष्ट्र शासनाच्या वतीने रुंदीने व उंचीने मोठा असा पूल करण्या संदर्भात प्रयत्न करावे. अशी मागणी या परिसरातील नागरिकांच्या वतीने करण्यात येत आहे. तसेच नगर–कल्याण रस्त्यावरील पूल आपण व सुजय विखे यांच्या प्रयत्नातून मंजूर होऊन काम सुरु झाले होते. परंतू मधल्या काळात ते पूलाचे काम खूपच संथगतीने सुरू आहे. सदरील पूलाच्या कामास आपण पाठपुरावा करुन पूलाचे काम लवकरात लवकर कसे पूर्ण होतील. असे प्रयत्न करावे.

सध्या नगर कल्याण रस्ता परिसरातील नागरिकांची या पुरामुळे खुपच बिकट अवस्था झालेली आहे. इतर मार्गाने जाण्यासाठी पर्यायी चिखलयुक्त रस्ता आहे. तरी या रस्ताची प्रशासनाकडून कडक मुरुम टाकून रस्त्याची डागडूजी केल्यास पर्यायी रस्ताने नागरिकांस जाणे–येण्यास सुलभता होईल. इथून पुढे आणखीन काही दिवस सतत पाऊस पडण्याचे हवामान तज्ञाने इशारा दिला आहे. तरी आपण तातडीने कल्याण रोड येथील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावा. असे या निवेदनात म्हटले आहे.

आ.संग्राम जगताप यांनी सांगितले, तातडीने लक्ष घालून कल्याण रोड येथील नदीच्या पुलाचे कामाला गती देण्यात येईल. तसेच वारुळाचा मारुती येथील पुलासंदर्भात उंची व रुंदी वाढवून नवीन पुल प्रस्तावित करण्यात येईल.

